सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

प्रधान मंत्री आवास योजना
Pradhan Mantri Awas Yojana

आज़ादी का अमृत महोत्सव

## ग्राम विकास विभाग

# राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण




# महा आवास

## त्रैमासिक

ऑक्टोबर ते डिसेंबर २०२१




महा आवास अभियान-ग्रामीण राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळे प्रसंगी मा. मंत्री, ग्रामविकास श्री.हसन मुश्रीफ यांचे स्वागत करतांना मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार



महा आवास अभियान-ग्रामीण राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळे प्रसंगी मा.राज्यमंत्री, ग्रामविकास व महसूल श्री. अब्दुल सत्तार यांचे पुणे येथे स्वागत करतांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. पुणे, श्री. आयुष प्रसाद




महा आवास अभियान-ग्रामीण राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळे प्रसंगी मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार यांचे स्वागत करतांना संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे




महा आवास अभियान-ग्रामीण २०२१-२२ या अभियानाची राज्यस्तरीय शुभारंभाची घोषणा करतांना मा. मंत्री, ग्रामविकास, श्री. हसन मुश्रीफ व इतर मान्यवर

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# ग्राम विकास विभाग

## संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष – ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय

## महा आवास

| | |
|---|---|
| मार्गदर्शक | राजेश कुमार, भा.प्र.से.<br>अतिरिक्त मुख्य सचिव,<br>ग्राम विकास व पंचायत राज विभाग |
| मुख्य संपादक | डॉ. राजाराम दिघे,<br>संचालक,<br>राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण |
| प्रबंध संपादक | मंजिरी टकले, उपसंचालक<br>नीलेश काळे, उपसंचालक<br>संजय घोगळे, प्र. सहा. संचालक (लेखा) |
| कार्यकारी संपादक | दिनेश मोवळे, प्रशिक्षण समन्वयक |
| सहाय्यक संपादक | डॉ. संघरत्न सोनवणे<br>राम आघाव<br>परमेश्वर शेलार<br>माधुरी चौधरी |
| मुख्यपृष्ठ मांडणी व सजावट | दिनेश मोवळे<br>प्रशिक्षण समन्वयक<br>(माहिती, शिक्षण व संवाद) |
| संपादकीय पत्ता | संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-<br>ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय<br>४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन,<br>सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४ |
| संकेत स्थळ | www.pmayg.nic.in<br>www.mahaawaas.com |
| ईमेल | directoriayruralhousing@gmail.com |
| दूरध्वनी क्रमांक | ०२२ - २७५६१८२४ |

वर्ष २ रे । अंक ६ वा । ऑक्टोबर ते डिसेंबर २०२१

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशिल | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | संपादकीय | १ |
| २ | विशेष - महा आवास अभियान-ग्रामीण २०२१-२२ | ३ |
| ३ | महा आवास अभियान-ग्रामीण बाबत मान्यवरांचे संदेश | ७ |
| ४ | विविध उपक्रमांचा मागोवा<br>क्षमता बांधणी उपक्रम | ८ |
| | संनियंत्रण व मूल्यमापन उपक्रम | १२ |
| | माहिती, शिक्षण व संवाद उपक्रम | १८ |
| | समन्वय उपक्रम | २० |
| | केंद्र व राज्य सरकार यांना ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रासंबंधित पॉलिसी इनपुट | २२ |
| ५ | ग्रामीण गृहनिर्माण योजनांचा संचित प्रगती अहवाल<br>प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण | २३ |
| | रमाई आवास योजना | २४ |
| | शबरी आवास योजना | २५ |
| | पारधी आवास योजना | २६ |
| | आदिम आवास योजना | २७ |
| | यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना | २७ |
| ६ | ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील नाविन्यपूर्ण उपक्रम/ यशोगाथा | २८ |
| ७ | फोटो गॅलरी | ३४ |
| ८ | मिडिया कवरेज | ३५ |


महा आवास हेल्पलाईन क्रमांक - १८०० २२ ०१९



**डॉ. राजाराम दिघे**
**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण**

माहे आक्टोबर ते डिसेंबर २०२१ या वर्षाच्या शेवटच्या अंकाच्या माध्यमातुन आपल्याशी संवाद साधताना मला अत्यंत आनंद होत आहे. मागील वर्षभरात आपण **"महा आवास अभियान-ग्रामीण २०२०-२१"** टप्पा १ या अभियानामध्ये अनेक नाविन्यपूर्ण उपक्रमांची सुरुवात या माध्यमातून केली. यामध्ये सर्व स्तरातील भागधारकांनी अत्यंत उत्स्फूर्तपणे या अभियानात आपला सहभाग नोंदविला. आपल्या राज्याचे मा. मुख्यमंत्री, मा. उप मुख्यमंत्री, मा. मंत्री, ग्रामविकास, मा. मंत्री, महसूल, मा.मंत्री, आदिवासी विकास, मा. मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, मा. राज्यमंत्री, ग्रामविकास व महसूल, मा. मुख्य सचिव, त्याचप्रमाणे मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग यांच्या मार्गदर्शनामुळे **"महा आवास अभियान-ग्रामीण २०२०-२१"** यशस्वी झाले.

गेल्यावर्षीच्या अभियानात विशेषतः पुढील उपक्रमांवर भर देण्यात आला होता. यामध्ये भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देणे, घरकुलांना मंजूरी देणे, मंजूरी नंतर लाभार्थ्यांना पहिल्या हप्त्याचे वितरण करणे, घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण करणे, घरकुलांना सर्व हप्त्याचे वितरण करून घरकुले आर्थिक दृष्टया पूर्ण करणे, पहिला हप्ता घेवून १२ महिन्यांपेक्षा जास्त कालावधी होवूनही ज्या लाभार्थ्यांनी घरकुलांचे काम सुरू केले नाही किंवा कामे अपूर्ण आहेत, अशी प्रलंबित घरकुले पूर्ण करणे, घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ग्रामीण गवंडी प्रशिक्षण राबविणे, घरकुल बांधकामासाठी लाभार्थ्यांना मार्गदर्शन मिळावे यासाठी प्रत्येक तालुक्यात पंचायत समिती आवारात डेमो हाऊसची निर्मिती करणे, तसेच लाभार्थ्यांचे आधार सिडींग व जॉबकार्ड मॅपिंग पूर्ण करणे, लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी विविध शासकीय योजनांशी कृती संगम करून लाभार्थ्यांना शासकीय योजनांचा लाभ देणे व इ. प्रमुख उपक्रम मागील अभियानात राबविण्यात आले होते. या उपक्रमासह गेल्या अभियानात नाविन्यपूर्ण उपक्रमांमध्ये लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम साहित्य एका छताखाली व बाजार भावाप्रमाणे उपलब्धतेसाठी घरकुल मार्ट, कमी जागा आहे अशा ठिकाणी बहुमजली इमारतीची उभारणी, जास्त जागा आहे अशा ठिकाणी गृह संकुलाची उभारणी, घरकुल बांधकामासाठी लाभार्थ्यांना गृहकर्जाची उपलब्धता, मूलभूत नागरी सुविधा देवून आदर्श घरांची निर्मिती, इ. उपक्रमांचा समावेश होता. गेल्यावर्षी अभियान कालावधीत उत्कृष्ट काम करणारे जिल्हे, तालुके, ग्रामपंचायतीं, वित्तीय संस्था, लाभार्थी, इ. यांना पुरस्कार वितरण कार्यक्रमाचे आयोजन करून **'महा आवास अभियान पुरस्कार'** देवून गौरविण्यात आले आहे. राज्यस्तरीय पुरस्कार वितरण कार्यक्रमही लवकरच आयोजित करण्यात येणार आहे.

महा आवास अभियान-ग्रामीण टप्पा १ च्या यशानंतर आवास योजनांमध्ये गतिमानता व गुणवत्ता आणण्यासाठी मा. मंत्री, ग्रामविकास, मा. राज्यमंत्री, ग्रामविकास व महसूल, मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग यांच्या मार्गदर्शनाने व संरचनेतुन **"महा आवास अभियान-ग्रामीण २०२१-२२"** टप्पा २ आपण सुरु केला आहे. हे अभियान मागील अभियानाप्रमाणेच असले तरी यामधील उपक्रमांमध्ये गुणात्मक बदल करण्यात आले आहेत. यामध्ये पूर्वीप्रमाणे १ ते १० उपक्रम असले तरी मागील अभियानाच्या अनुभवातून प्रत्येक उपक्रमासोबत एक सहाय्यकारी उपक्रमांचा समावेश केला आहे. जसे भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देणे सोबत बहुमजली इमारत गृहसंकुल उभारणे, घरकुलांना उद्दीष्टानुसार मंजूरी देण्यासोबत लाभार्थी मेळावे, भूमीपुजन कार्यक्रम व प्रत्यक्ष घरकुलाचे बांधकाम सुरु या बाबींकडेही या अभियानात लक्ष असणार आहे. तसेच मंजूरी नंतर पहिल्या हप्त्याचे वितरण तात्काळ करणे या सोबत मंजूरी दिलेल्या लाभार्थ्यांना सात दिवसाच्या आत पहिल्या हप्त्याचे वितरण करणे. स्थानिक स्तरावर पहिला हप्ता वितरण कायक्रमाचे आयोजन करणे. पहिला हप्ता वितरणा सोबत तात्काळ मनरेगावर जनरेट करणे याचा समावेश

करण्यात आला आहे. घरकुले भौतिक व आर्थिक दृष्टया पूर्ण करणे सोबत लाभार्थ्यांना वाजवी दरामध्ये जवळच्या ठिकाणी साहित्य उपलब्धतेसाठी घरकुल मार्ट सुरु करणे याचा समावेश केला आहे. त्यातून घरकुले ११० दिवसात पूर्ण करण्याचे लक्ष ठेवले आहे. प्रलंबित घरकुले पूर्ण करण्यासोबत प्रलंबित घरकुलांची विगतवारी करुन रिमांड व रिफंड प्रक्रियेसोबत लोक अदालती द्वारे घरकुले पूर्ण करुन घेणे. तसेच ग्रामीण गवंडी प्रशिक्षण पूर्ण करण्यासोबत प्रशिक्षीत व उपलब्ध गवंडयांचे पॅनल तयार करणे व या प्रशिक्षीत गवंडयांना घरकुलाचे काम देणे. तालुका स्तरीय डेमो हाऊस पूर्ण करणे व जिल्हास्तरीय डेमो हाऊसची नव्याने निर्मिती करणे. याबरोबरच डेमो हाऊसच्या उपयोगामध्ये लाभार्थ्यांच्या डेमो हाऊसला भेटी व डेमो हाऊसमध्ये कॉप-शॉप सुरु करणे, याचा समावेश करण्यात आला आहे. तसेच यावेळी राज्य योजनेतील लाभार्थ्यांचा आधार सिडींगचा समावेश केला आहे. लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासकीय योजनांच्या कृती संगमामध्ये महाउर्जाचा समावेश आहे. तसेच लाभार्थ्यांना मूलभूत नागरी सुविधा देण्यासाठी पूर्वीच्या योजनांबरोबरच दलितवस्ती सुधार योजना, ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार कार्यक्रम, जिल्हा परिषद सेस, पंचायत समिती सेस, ग्रामपंचायत सेस बरोबरच सीएसआर निधीचांही समावेश केला आहे. नाविन्यपूर्ण उपक्रमांमध्ये यावेळी नव्याने बहुमजली गृह संकुले, प्रत्येक ग्रामपंचायत स्तरावर लँड बँक, सँड बँक, इ. यांची निर्मिती करणे व लाभार्थ्यांना उपलब्ध करुन देणे. या बरोबरच किमान १० % घरकुल बांधकामासाठी स्थानिक बांधकाम साहित्य, नवनवीन बांधकाम तंत्रज्ञान, नैसर्गिक आपत्ती रोधक तंत्रज्ञान इ. चा वापर व किमान १० % घरकुल बांधकामामध्ये फरशी / लादी, रंगरंगोटी, किचनगार्डन/परसबाग, रेनवॉटर हार्वेस्टिंग, सौर ऊर्जा साधने व नेट बिलिंग इ. चा वापर करणे, इ. उपक्रमांचा समावेश केला आहे. या उपक्रमांच्या अंमलबजावणीतून योजनांमध्ये गतीमानता व गुणवत्ता प्राप्त होणार आहे. याशिवाय या अभियानात राज्यस्तरीय कार्यशाळा, विभागस्तरीय कार्यशाळा, जिल्हास्तरीय कार्यशाळा, तालुकास्तरीय कार्यशाळा, ग्रामपंचायतस्तरीय कार्यशाळा, ग्राम कृती गटाचे गठण, बँक मेळावे व लाभार्थी मेळावे, इ. माध्यमातून क्षमता बांधणी करण्यात येत आहे. तसेच विभागस्तरावर होर्डींग, जिल्हास्तरावर होर्डींग, पोस्टर, तालुकास्तरावर होर्डींग व पोस्टर, ग्रामपंचायतस्तरावर बॅनर व पोस्टर, इ. माहिती, शिक्षण व संवाद उपक्रमांचा समावेश केला आहे. त्याप्रमाणे आपण आपल्या जिल्हयातील, तालुक्यातील, ग्रामपंचायत स्तरावरील कार्यशाळांचे विहीत वेळेत नियोजन करावे. या अभियानाच्या यशस्वीतेशाठी आपण सक्रिय सहभाग नोंदवावा. अभियान कालावधीत उत्कृष्ट काम करणाऱ्या व्यक्ती/संस्था यांना महा आवास अभियान पुरस्कार देवून गौरविण्यात येईल.

याशिवाय सदर अंकामध्ये **"महा आवास अभियान-ग्रामीण २०२१-२२"** टप्पा २ साठी मा. मंत्री, ग्रामविकास, मा. राज्यमंत्री, ग्रामविकास व महसूल व मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग या मान्यवरांचे संदेश आहेत. पूणे येथे झालेली अधिकाऱ्यांची बैठक, महा आवास अभियान टप्पा २ राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळा, मा. केंद्रीय राज्यमंत्री श्री. कपिल पाटील यांची आढावा बैठक, मा.अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग यांच्या अध्यक्षतेखाली कॉप-शॉप सुरु करणे, महा आवास अभियान बाबत आढावा बैठका, राज्यस्तरीय अधिकाऱ्यांच्या क्षेत्रीय भेटी, चंदगड तालुक्यातील लोक अदालत, विविध स्तरावरील पुरस्कार वितरण, मा. राज्यमंत्री, ग्रामविकास व महसूल यांची भूमिहीन लाभार्थ्यांना जागा व वाळू उपलब्धतेसाठीची आढावा बैठक, अभियान हेल्पलाईन, राज्यस्तरीय अधिकाऱ्यांची परिषद, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता ॲपचा शुभारंभ, योजनांचा संचित प्रगती अहवाला बरोबरच गोंदिया जिल्हयातील गोरेगाव तालुक्यातील मूंडीपार या गावातील बोपचे कुटूंबीयांची यशोगाथा, तालुका संग्रामपूर, बुलढाणा जिल्हयातील रमाई योजनेची यशोगाथा, अडावद येथे ५० आदिवासी कुटूंबाची कॉलनी तयार केलेली जळगांव जिल्हातील चोपडा तालुक्यातील यशोगाथा, मळगाव येथील यशोगाथा व शेंद्रे ता. जि. सातारा येथील यशोगाथा, देवगड, सिंधूदुर्ग तालुक्यातील कोट कामने ग्रामपंचायतीची यशोगाथा, विविध स्तरावरील कार्यक्रमाचे फोटो, विविध जिल्हयातील वर्तमानपत्रातील बातम्या इ. बाबींमिळून हा अंक तयार झाला आहे. सदर अंक आपणास नक्की आवडेल. यामध्येही आपला सक्रीय सहभाग असेल अशी आशा व्यक्त करतो.

अनेक शुभेच्छांसह!

**डॉ. राजाराम दिघे**
**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण**

विशेष

# महा आवास अभियान-ग्रामीण २०२१ - २२

**'सर्वांसाठी घरे-२०२२'** हे केंद्र शासनाचे महत्वाचे धोरण असून राज्य शासनाने देखील या धोरणाचा स्विकार केला आहे. या अनुषंगाने राज्यात राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाच्या माध्यमातून केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण तसेच राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना अशा विविध ग्रामीण गृहनिर्माण योजना राबविण्यात येत असून त्यांना पूरक पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, अतिक्रमण नियमानुकूल करण्याची योजना अशा योजनाही राबविण्यात येत आहेत.

गत वर्षी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत **आवास दिनाचे औचित्य साधून** राज्यात सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजना अधिक गतिमान करण्यासाठी व गुणवत्तावाढीसाठी दिनांक २० नोव्हेंबर २०२० ते ०५ जून २०२१ या कालावधीत **महा आवास अभियान-ग्रामीण** राबविण्यात आले. या अभियानामुळे विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या अंमलबजावणीमध्ये आलेली गतीमानता व गुणवत्तावाढ विचारात घेता सन २०२१-२२ या वर्षामध्ये **दिनांक २० नोव्हेंबर २०२१ ते ३१ मार्च, २०२२ या कालावधीत 'महा आवास अभियान-ग्रामीण २०२१-२२'** राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे.

## अभियान राबविण्याचे उद्देश

i. राज्यात ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामास गतिमान करणे.

ii. ग्रामीण गृहनिर्माण योजनांमध्ये शासकीय यंत्रणा व पंचायतराज संस्था यांचेबरोबरच समाजातील सर्व घटक जसे-स्वयंसेवी संस्था (लायन्स क्लब, रोटरी क्लब, इ.), सहकारी संस्था (साखर कारखाने, दुधसंघ, इ.), खासगी संस्था (Corporates), तंत्र शिक्षण संस्था (IITB, COEP, VNIT, इ.), बँका, लोकप्रतिनिधी, लाभार्थी, ग्रामस्थ, इ. भागधारकांचा सक्रीय सहभाग वाढविणे.

iii. ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रामध्ये नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून घरांची गुणवत्ता वाढविणे.

iv. ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाच्या विविध योजनांचा कृतिसंगम (Convergence) घडवून आणणे.

v. राज्यात ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील भागधारकांची क्षमता बांधणी व जन-जागृतीद्वारे लोक चळवळ उभी करणे.

## अभियान कालावधीत राबवावयाचे उपक्रम

**i. भूमीहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देणे :-** ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत गरजू, पात्र परंतु घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध नसलेल्या लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करण्यासाठी पुढील उपाययोजना करणे.

अ) **पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना,** शासकीय जागा विनामूल्य उपलब्ध करण्याची योजना, ग्रामीण भागातील अतिक्रमणे नियमानुकूल करण्याची योजना व इतर मार्ग - उदा. बक्षीसपत्र, भाडेपट्टा, इ. प्रभावीपणे राबविणे.

ब) कमी जागेत जास्त लाभार्थी सामावण्यासाठी राज्यात प्रत्येक जिल्हा परिषद गटामध्ये किमान एक याप्रमाणे **बहुमजली इमारती व गृह संकुले** उभारणे.

**ii. घरकुलांना उद्दिष्टांप्रमाणे १०० टक्के मंजूरी देणे :-** केंद्र पुरस्कृत व राज्य पुरस्कृत योजनांतर्गत सन २०१६-१७ ते २०२१-२२ पर्यंत जिल्ह्यांना वितरीत करण्यात आलेल्या घरकुल उद्दिष्टांना १०० टक्के मंजूरी देण्याकरीता पुढील प्रमाणे उपाययोजना करणे.

अ) घरकुल लाभार्थ्यांची नोंदणी (Registration), Geo tagging, Account Verification, इ. प्रक्रिया **किमान कालावधीत पूर्ण करुन मंजूरी देणे.**

ब) लाभार्थ्यांना घरकुल मंजूरीचे पत्र त्वरीत वितरीत करणे, घरकुलाचे काम तात्काळ सुरु करणेबाबत सूचना देणे, घरकुल बांधकामाबाबत तांत्रिक मार्गदर्शन करणे व भूमिपूजन कार्यक्रम करुन **घरकुलाचे बांधकाम सुरु करणे.**

**iii. मंजूर घरकुलांना पहिल्या हप्त्याचे १०० टक्के वितरण करणे :-** केंद्र पुरस्कृत व राज्य पुरस्कृत योजनांतर्गत सन २०१६-१७ ते २०२१-२२ मधील मंजूर घरकुलांना पहिल्या हप्त्याचे १०० टक्के वितरण विनाविलंब करण्याकरीता पुढील उपाययोजना करणे.

अ) घरकुलास मंजूरी दिलेल्या लाभार्थ्यांना ७ **दिवसाच्या आत पहिल्या हप्त्याचे वितरण करणे** व स्थानिक स्तरावर पहिला हप्ता वितरण कार्यक्रमाचे आयोजन करणे.

ब) पहिला हप्ता वितरण झाल्याबरोबर तात्काळ मनरेगा मस्टर जनरेट करणेबाबतची कार्यवाही करणे.

**iv. सर्व मंजूर घरकुले भौतिक व आर्थिक दृष्ट्या पूर्ण करणे :-** केंद्र पुरस्कृत व राज्य पुरस्कृत योजनांतर्गत सन २०१६-१७ ते २०२१-२२ मधील सर्व मंजूर घरकुलांचे काम भौतिक






व आर्थिक दृष्ट्या पूर्ण करण्यासाठी पुढील उपाययोजना करणे.

अ) राज्यात महिला स्वयंसहायता गट/ग्राम संघ/प्रभाग संघ/विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था/शेतकरी उत्पादक कंपनी, इ. समुदाय आधारीत संस्थाद्वारे **प्रत्येक जिल्हा परिषद गटामध्ये किमान एक घरकुल मार्ट सुरु करुन** त्याद्वारे घरकुलाचे बांधकाम साहित्य जसे - दगड, विटा, वाळू, सिमेंट, दारे, खिडक्या, छताचे साहित्य, इ. उपलब्ध करणे, किमान कालावधीमध्ये घरकुले भौतिकदृष्टया पूर्ण करण्यासाठी सरपंच, ग्रामसेवक/ग्राम विकास अधिकारी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांनी घरकुलांना वेळोवळी भेटी देणे, आवास द्वारे घरकुल बांधकामाचे टप्पानिहाय फोटो अपलोड करणे, मनरेगा मस्टर जनरेट करणे व **मंजूर केलेली सर्व घरकुले १०० ते १२० दिवसात पूर्ण करणे.**

ब) सर्व घरकुले आर्थिकदृष्ट्या पूर्ण करण्यासाठी लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाच्या भौतिक प्रगतीनुसार टप्पानिहाय **सर्व हप्ते किमान कालावधीत वितरीत करणे.** तसेच गरजे प्रमाणे इच्छूक लाभार्थ्यांना वित्तीय संस्थांकडून गृहकर्ज मिळवूण देणे.

**v. प्रलंबित घरकुले (Delayed Houses) पूर्ण करणे :-** प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत घरकुलांना पहिला हप्ता प्रदान केल्यापासून १२ महिन्यापेक्षा जास्त कालावधी झालेली, मात्र अद्यापपर्यंत अपूर्ण असलेली प्रलंबित घरकुले (Delayed Houses) प्राधान्याने पूर्ण करण्यासाठी पुढील उपाययोजना करणे.

अ) प्रलंबित घरकुलांच्या यादीनुसार घरकुले प्रलंबित राहण्यामागची कारणे शोधून त्या **कारणांचे विश्लेषण करुन त्यावर उपाययोजना करणे व प्राधान्याने सदर घरकुले पूर्ण करणे,** याकामी गरजेप्रमाणे तालुका कायदेविषयक सहाय्य व सल्ला समितीच्या सहाय्याने **लोक अदालत** द्वारे लाभार्थ्यांना घरकुल पूर्ण करण्यासाठी प्रवृत्त करणे.

ब) पूर्ण होऊ न शकणारी प्रलंबित घरकुले प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीणच्या मार्गदर्शक सूचनांनुसार Refund करुन Remand करणे, तसेच **यापुढे प्रलंबित घरकुलांच्या यादीमध्ये नविन घरकुलांचा समावेश होणार नाही याची दक्षता घेणे.**

**vi. ग्रामीण गवंडी प्रशिक्षण पूर्ण करणे :-** घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ग्रामीण गवंडी प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्दिष्ट प्रशिक्षण देणाऱ्या संस्था (Training Provider) यांच्याशी समन्वय ठेवून पूर्ण करुन कुशल गवंडी तयार करण्याकरीता पुढील उपाययोजना करणे.

अ) प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ग्रामीण गवंडी प्रशिक्षणाच्या उद्दिष्टानुसार **गवंडी प्रशिक्षण पूर्ण करुन त्यांचे मुल्यांकन(Assessment) त्वरीत पूर्ण करुन घेणे** व सदर माहिती आवास सॉफ्टवर अद्ययावत होईल याची खात्री करणे.

ब) प्रशिक्षित ग्रामीण गवंडी व ग्रामपंचायत क्षेत्रातील इतर उपलब्ध गवंडी यांची ग्रामपंचायतनिहाय यादी तयार करुन त्यांचे पॅनेल बनविणे व या **पॅनेलमधील गवंड्यांचा ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील घरकुलांच्या बांधकामात सहभाग घेणे.**

**vii. डेमो हाऊस (Demo House) निर्मिती व उपयोग :-** घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी व लाभार्थ्यांना मार्गदर्शक ठरण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत डेमो हाऊस निर्मिती व उपयोगाबाबत पुढीलप्रमाणे उपाययोजना करणे.

अ) तालुकास्तरीय अपूर्ण डेमो हाऊसेस पूर्ण करणे, जिल्ह्याच्या Geo-Climatic, Socio- Cultural Conditions व Locally Available Construction Materials चा विचार करुन **जिल्हास्तरीय डेमो हाऊसेसची निर्मिती करणे.**

ब) तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय डेमो हाऊसला घरकुल लाभार्थ्यांच्या प्रत्यक्ष भेटींचे आयोजन करणे, प्रत्येक डेमो हाऊसमध्ये माहिती कक्ष किंवा **लाभार्थी / महिला स्वयं सहायता गट यांच्या उत्पादनांच्या विक्रीसाठी महिला स्वयंसहायता गट/ग्रामसंघ/प्रभाग संघ/विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था/शेतकरी उत्पादक कंपनी, इ. समुदाय आधारीत संस्थांच्या सहकार्यातून कॉप-शॉप (Co-op Shop) सुरु करणे.**

**viii. सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या लाभार्थ्यांचे आधार सिडींग व जॉब कार्ड मॅपिंग पूर्ण करणे :-** प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत सर्व आवास योजना मधील लाभार्थ्यांचे आधार सिडींग व जॉब कार्ड मॅपिंग पूर्ण करण्यासाठी पुढीलप्रमाणे उपाययोजना करणे.

**अ) प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण** मधील सर्व लाभार्थ्यांचे आधार कार्ड व जॉब कार्ड काढून त्यांचे **आधार सिडींग व जॉब कार्ड मॅपिंग पूर्ण करणे.**

**ब) राज्य पुरस्कृत** रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना मधील सर्व **लाभार्थ्यांचे** आधार कार्ड व जॉब कार्ड काढून त्यांचे **आधार सिडींग व जॉब कार्ड मॅपिंग पूर्ण करणे.**

**ix. शासकीय योजनांशी कृतीसंगम (Convergence) करणे :-** पुढील प्रमाणे शासनाच्या विविध योजनांशी कृतीसंगमातून सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांतील लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावणे.



अ) ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील लाभार्थ्यांना रोजगार मिळवून देण्यासाठी **महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना,** शौचालय साठी **स्वच्छ भारत मिशन-ग्रामीण,** नळाने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणेसाठी **जल जीवन मिशन,** गॅस जोडणी साठी **प्रधानमंत्री उज्वला योजना,** विद्युत जोडणी साठी **सौभाग्य योजना,** उपजिविकेचे साधन उपलब्ध करुन देणेसाठी **राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती मिशन,** उर्जेच्या बचतीसाठी **महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण (महाउर्जा),** इ. शासकीय योजनांशी कृतीसंगम करणे.

ब) तसेच दलित वस्ती सुधार योजना, ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजना, जिल्हा परिषद सेस, पंचायत समिती सेस, ग्राम पंचायत सेस, सीएसआर निधी इ. च्या माध्यमातून **लाभार्थ्यांना मूलभूत नागरी सुविधा जसे जोडरस्ते, अंतर्गत रस्ते, ड्रेनेज सिस्टीम, पथदिवे, इ. उपलब्ध करुन देणे.**

**x. नावीन्यपूर्ण उपक्रम (Innovations / Best Practices) राबविणे :-** ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या अंमलबजावणीमध्ये गतिमानता व गुणवत्ता येण्यासाठी पुढीलप्रमाणे नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणे.

अ) राज्यात प्रत्येक जिल्हा परिषद गटामध्ये किमान एक या प्रमाणे **बहुमजली गृह संकुले (हाऊसिंग अपार्टमेंट)** उभारणे आणि त्यांच्या सहकारी संस्था स्थापन करणे.

ब) सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाकरीता जागा उपलब्ध करुन देण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर **विविध मार्गांनी उपलब्ध होणाऱ्या जागांची लॅण्ड बँक तयार करणे.**

क) सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाकरीता वाळू उपलब्ध करुन देण्यासाठी प्रत्येक जिल्हा परिषद गटात किमान एक याप्रमाणे **सॅण्ड बँक ची निर्मिती करणे.** तसेच **वाळूला पर्याय** म्हणून क्रश सॅण्ड, सिमेंट ब्लॉक, फ्लाय ॲश ब्रिक्स, इंटर लॉकींग ब्रिक्स, हॉलो ब्रिक्स, इत्यादींचा वापर करणे.

ड) किमान १०% घरकुल बांधकामासाठी स्थानिक बांधकाम साहित्य, नवनवीन बांधकाम तंत्रज्ञान, किफायतशीर बांधकाम तंत्रज्ञान, नैसर्गिक आपत्ती रोधक तंत्रज्ञान, इ. चा वापर करणे.

इ) किमान १०% घरकुल बांधकामामध्ये फरशी/लादी, रंगरंगोटी, किचन गार्डन/परसबाग, रेन वॉटर हार्वेस्टींग, सौरउर्जा साधने व नेट बिलींग, इ.चा वापर करणे.

## अभियानाच्या अंमलबाावणीसाठी क्षमताबांधणी कार्यक्रम

**महा आवास अभियान-ग्रामीण** या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व भागधारकांच्या क्षमता बांधणीसाठी **राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळा, विभागस्तरीय कार्यशाळा, जिल्हास्तरीय कार्यशाळा, तालुकास्तरीय कार्यशाळा, ग्रामस्तरीय कार्यशाळा** आयोजित करुन त्यामध्ये अभियानाबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

**ग्राम कृती गटाचे (Village Action Group) गठन :-** या ग्रामस्तरीय कार्यशाळेमध्ये प्रत्येक ग्रामपंचायती मध्ये **'ग्राम कृती गटाचे गठन'** करण्यात यावे. यामध्ये गावातील प्रभावी व्यक्ती, युवक/युवती, इत्यादींचा समावेश करता येईल. उदा. सरपंच, ग्रामसेवक, पोलीस पाटील, शिक्षक, पोलीस इ. प्रभावी व्यक्ती. या गटाने 'महा आवास अभियान-ग्रामीण २०२१-२२' मध्ये गावस्तरावर केल्या जाणाऱ्या व करावयाच्या प्रत्यक्ष उपाय योजनांचा पाठपुरावा करुन अभियान १०० टक्के यशस्वी करावयाचे आहे.

**लाभार्थी मेळावे :-** गावोगावी लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत लाभार्थ्यांचे मेळावे आयोजित करुन लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम व दर्जाबाबत मार्गदर्शन, प्रोत्साहन देणे, तसेच लाभार्थ्यांना घरकुल मंजूरी पत्र वितरण करणे, घरकुलाचे भूमिपूजन कार्यक्रम आयोजित करणे, घरकुलांचे हप्ते वितरण कार्यक्रम करणे, गृहप्रवेश कार्यक्रम करणे, इ. सारखे उपक्रम राबविणेत यावेत.

**बँक मेळावे :-** तालुकास्तरावर/ गावोगावी बँक अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत घरासाठी कर्ज घेवू इच्छिणाऱ्या लाभार्थ्यांसाठी बँक मेळाव्याचे आयोजन करुन लाभार्थ्यांना घरकुल बांधण्यासाठी कर्ज उपलब्धतेसाठी प्रयत्न करण्यात यावेत.

## 'महा आवास अभियान- ग्रामीण २०२१-२२' चा प्रचार व प्रसिध्दीसाठी माहिती शिक्षण व संवाद (IEC) कार्यक्रम

'महा आवास अभियान- ग्रामीण २०२१-२२' अंतर्गत राज्यात राबविण्यात येणाऱ्या विविध घरकुल योजनांबाबत जन जागृती, प्रचार-प्रसिध्दी करण्यासाठी माहिती, शिक्षण व संवाद (IEC) च्या विविध उपक्रमांचा जसे- Mass मिडीया, Outdoor मिडीया, Social मिडीया, Group मिडीया, आंतरव्यक्ती संवाद (IPC), पारंपारीक मिडीया, इ. उपक्रमांचा यथोचीत वापर करण्यात यावा.

## अभियानाची प्रभावी अंमलबजावणी, सनियंत्रण व मूल्यमापन

**'महा आवास अभियान-ग्रामीण २०२१-२२'** च्या प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी राज्य, विभाग, जिल्हा, तालुका व गाव स्तरावर पुढीलप्रमाणे समित्या कार्यरत राहतील. तसेच दिनांक २० नोव्हेंबर २०२१ ते ३१ मार्च २०२२ हा अभियान कालावधी संपल्यावर अभियानात राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे मूल्यमापन करण्यात येईल. या मूल्यमापनाच्या आधारे राज्य, विभाग,



जिल्हा, तालुका, ग्रामस्तरावर उत्कृष्ट कामासाठीच्या पुरस्कारांची नामांकने या समित्याव्दारे निवडण्यात येतील.

| पुरस्कार नामांकने | उत्कृष्ट कामासाठीच्या पुरस्कारांची नामांकने निवडण्यासाठी समित्या |
|---|---|
| राज्यस्तरीय पुरस्कारांची निवड | राज्यस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती |
| विभागस्तरीय पुरस्कारांची निवड | विभागस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती |
| जिल्हास्तरीय पुरस्कारांची निवड | जिल्हास्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती |
| तालुकास्तरीय पुरस्कारांची निवड | तालुकास्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती |
| ग्रामपंचायतस्तरीय पुरस्कारांची निवड | तालुकास्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती |

## अभियान कालावधीतील उत्कृष्ट कार्याचा गौरव

**'महा आवास अभियान-ग्रामीण २०२१-२२'** मध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था व व्यक्तींना पुढीलप्रमाणे **'महा आवास अभियान पुरस्कार २०२१-२२'** देऊन गौरविण्यात येईल. पुरस्काराचे स्वरुप, पुरस्कार वितरण कार्यक्रमाचे वेळापत्रक इत्यादी बाबत स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

### -: राज्यस्तरीय पुरस्कार :-

**I. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण**

I. सर्वोत्कृष्ट विभाग- प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक.
ii. सर्वोत्कृष्ट जिल्हे - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक.
iii. सर्वोत्कृष्ट तालुके - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक.
iv.सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
v. सर्वोत्कृष्ट बहुमजली इमारत, सर्वोत्कृष्ट गृह संकुल व बहुमजली गृह संकुल (हाऊसिंग अपार्टमेंट) - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक.

**II. राज्य पुरस्कृत आवास योजना**

I. सर्वोत्कृष्ट विभाग- प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक.
ii. सर्वोत्कृष्ट जिल्हे - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक.
iii. सर्वोत्कृष्ट तालुके - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक.
iv.सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक.
v. सर्वोत्कृष्ट बहुमजली इमारत, सर्वोत्कृष्ट गृह संकुल व बहुमजली गृह संकुल (हाऊसिंग अपार्टमेंट) - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक.

### -: विभागस्तरीय पुरस्कार :-

**I. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण**

I. सर्वोत्कृष्ट जिल्हे - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक.
ii. सर्वोत्कृष्ट तालुके - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक.
iii.सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक.
iv.शासकीय जागा उपलब्धता व वाळू उपलब्धता सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे तालुके - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक.

**I. राज्य पुरस्कृत आवास योजना**

I. सर्वोत्कृष्ट जिल्हे - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक.
ii. सर्वोत्कृष्ट तालुके - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक.
iii.सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक.
iv.शासकीय जागा उपलब्धता व वाळू उपलब्धता सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे तालुके - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक.

### -: जिल्हास्तरीय पुरस्कार :-

**I. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण**

I. सर्वोत्कृष्ट तालुके - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक.
ii. सर्वोत्कृष्ट क्लस्टर - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक.
iii.सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक.

**II. राज्य पुरस्कृत आवास योजना**

I. सर्वोत्कृष्ट तालुके - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक.
ii. सर्वोत्कृष्ट क्लस्टर - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iii.सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.

### -: तालुकास्तरीय पुरस्कार :-

**I. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण**

I. सर्वोत्कृष्ट क्लस्टर - प्रथम क्रमांक.
ii. सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक.
iii. सर्वोत्कृष्ट घरकुल - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक.

**II. राज्य पुरस्कृत आवास योजना**

I. सर्वोत्कृष्ट क्लस्टर - प्रथम क्रमांक.
ii. सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक.
iii. सर्वोत्कृष्ट घरकुल - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक.

### -: ग्रामपंचायतस्तरीय पुरस्कार :-

**I. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण**

I. सर्वोत्कृष्ट घरकुल - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक.

**II. राज्य पुरस्कृत आवास योजना**

I. सर्वोत्कृष्ट घरकुल - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक.





## "गरीब माणसाच्या घरकुलासाठी प्रामाणिक प्रयत्न केले तर आपल्याला आशिर्वाद लाभेल"

**- मा.ना. श्री. हसन मुश्रीफ, मंत्री, ग्रामविकास**



आज दिनांक २३ फेब्रुवारी, २०२१ रोजी महा आवास अभियान-ग्रामीण २.० चा शुभारंभ झाला असे मी घोषित करतो. आज या राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळे प्रसंगी आपण सर्वांनी अभियानात ५ लाख घरकुले पूर्ण करण्याचा संकल्प करूया. गरिबाला स्वतःच्या घराची फार मोठी किंमत असते. डोक्यावर हक्काचं छत असावं आणि त्या छताखाली आपल्या मुलाबाळांसह संसार सुखाने चालावा अशी गरिब माणसाची साधी इच्छा असते. यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध ग्रामीण आवास योजनांची अंमलबजावणी करून गरिबांच्या स्वतःच्या घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आपण सर्वांनी सहकार्य करावे. हा खरा महा आवास अभियानाचा उद्देश!

राज्यमंत्री महोदयांनी सांगितल्या प्रमाणे ५० हजारामध्ये जागा मिळत नसल्याने महसूल विभागाचे अतिरिक्त सचिव, श्री. नितीन करीर व ग्रामविकास व पंचायत राज विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव, श्री. राजेश कुमार यांनी समन्वयाने गायरान व शेती महामंडळाच्या जागा लाभार्थ्यांना उपलब्धतेबाबत किंवा घरकुल लाभार्थ्यांसाठी जागा खरेदीचा गांभीर्याने विचार करावा. तसेच उत्तर प्रदेश सारखे राज्य घरकुल बांधकामात आपल्यापेक्षा पुढे असेल, तर आपण याबाबत गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे.

कोरोनाच्या अतिशय प्रतिकुल परिस्थिती मध्ये टप्पा-१ यशस्वीरित्या पूर्ण केलाबद्दल सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन, तसेच टाईम बाऊंड नियोजन करून टप्पा-२ मध्ये ५ लाख घरकुलाचे उद्दिष्ट पूर्ण करावे. टप्पा-१ च्या राज्यस्तरीय शुभारंभ व ई-गृहप्रवेश ह्या दोन्ही कार्यक्रमास मा. मुख्यमंत्री महोदयांनी एकच शर्ट घातला असल्याने **'माझा शर्ट बदलायच्या आत ग्रामविकास विभागाने ५ लाख घरकुले पूर्ण केली'** असे उद्‌गार काढले होते. असेच काम टप्पा-२ मध्ये करूया. गरिबांना घर देणे म्हणजे देवाचे काम, तेव्हा गरिब माणसाच्या घरकुलासाठी प्रमाणिक प्रयत्न केले तर आपल्याला आशिर्वाद लाभेल!

## "जागा व वाळूची उपलब्धतेची अडचण घरकुल बांधकामासाठी येणार नाही"

**- मा.ना. श्री. अब्दुल सत्तार, राज्यमंत्री, ग्रामविकास व महसूल**



महा आवास अभियानाच्या पहिल्या टप्प्यात ४ लाख २५ हजार घरकुले पूर्ण झाली असून ३ लाख घरे पूर्णत्वाच्या मार्गावर आहे. टप्पा-१ मध्ये ज्यांच्याकडे घरकुल बांधकामाकरीता जागा नाही अशा ५०,११२ लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून दिली.

आज मी पुणे येथून व्हि.सी. व्दारे उपस्थित असल्याने माझ्या असे निर्दशनास आले की, गायरान जमीनीची मोजणी झाली नसल्याने लाभार्थ्यांना जागा देवू शकत नाही. घरकुल जागा खरेदीसाठी तुकडा पध्दती आहे. परंतु अनेक ठिकाणी रजिस्ट्रेशन करण्यास अडचणी येत आहे. त्यामुळे लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम करता येत नाही. माझ्याकडे ग्रामविकास व महसूल दोन्ही खाते असल्याने मी श्री. बाळासाहेब थोरात, महसूल मंत्री महोदयांशी चर्चा करून ग्रामविकास विभागाच्या अडचणी सोडविण्याचा पूर्ण प्रयत्न करेल.

सर्वांसाठी घरे जसे मा. प्रधानमंत्र्यांचे स्वप्न आहे, तसेच **मा. मुख्यमंत्री महोदयांचेही स्वप्न आहे की, माझ्या राज्यात राहणारा माणूस हा झोपडी किंवा कच्च्या घरात न राहाता पक्क्या घरामध्ये राहावा.** हे करायचे असेल तर वाळू उपलब्धता आवश्यक आहे. त्याकरीता लाभार्थ्यांना राखीव केलेल्या घाटासह त्यांच्या नजिकच्या ठिकाणच्या वाळू घाटावरून वाळू उचलण्याची परवानगी देण्यात येईल. यामुळे लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी सहज वाळू उपलब्ध होऊन घरकुले लवकरात लवकर पूर्ण होईल.

टप्पा-१ मध्ये घरकुले, बहुमजली इमारती, गृह संकुले व घरकुल मार्ट इ. ची मोठ्या प्रमाणात उभारणी केली. त्याबाद्दल मी सर्वांचे अभिनंदन करतो. लाभार्थ्यांचे घरकुलाचे प्रस्ताव व त्यांना देय हप्ते विहीत मुदतीत मिळण्यासाठी आमच्या मंत्री लेव्हलवर आढावा घेण्यात येईल. सन २०२१-२२ चे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी अंमलबजावणी यंत्रणेच्या अडचणी लक्षात घेवून आवश्यकतेनुसार नियम शिथिल करू.

## "महा आवास अभियान संपूर्ण देशाला मार्गदर्शक ठरणार"

**- मा. राजेश कुमार, भा.प्र.से., अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग**



गेल्यावर्षी मा. मंत्री महोदयांच्या संकल्पनेतून महा आवास अभियान राबवून कोरोनामुळे आलेली मरगळ दूर करून ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामात गतीमानता आली. गोंदिया व अहमदनगर यांच्यासह सर्वच जिल्ह्याने अभियानात उत्कृष्ट कामगिरी केली आहे. या सर्वांना मा. मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते पुरस्कार देवून गौरविणार आहोत. गेल्यावर्षी पेक्षाही या वर्षी आपण चांगले काम या अभियानात करूया.

महसुल विभाग व त्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव यांनी वाळू व जमीन उपलब्धता याबाबत विशेष सहकार्य केले आहे. घरकुल लाभार्थ्यांसाठी मुद्रांक शुल्क/नोंदणी शुल्क यामध्ये सवलत मिळणे बाबतचा प्रस्ताव कॅबिनेटमध्ये आहे. उत्तर प्रदेश राज्यात घरकुल बांधकाम पूर्ण करण्याकरीता ११० दिवस तर आपल्या राज्यात ३५७ दिवस जवळ जवळ १ वर्ष लागतात. हा कालावधी कमी करण्याची गरज आहे. केंद्र सरकारला महाराष्ट्राकडून कमी खर्चाची घरकुले, सोलारसह गृह संकुले, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन घरकुले व नैसर्गिक आपत्ती रोधक घरकुले इ. असे नावीन्यपूर्ण कामे अपेक्षित आहे. याकरीता आय. आय. टी. मुंबई सारख्या नामांकीत संस्थाच्या मदतीने पूर्ण करू. अशी घरकुले पूर्ण केली तर हे **महा आवास अभियान संपूर्ण देशाला मार्गदर्शक ठरणार आहे.** या अभियानात ५ लाख घरकुलाचे उद्दिष्ट पूर्ण करून हे अभियान यशस्वी करण्याचे मी सर्वांना आवाहन करतो.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची पुणे येथे दोन दिवसीय परिषद

दिनांक ०७ व ०८ ऑक्टोबर, २०२१ या कालावधीत राज्यातील सर्व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दोन दिवसीय परिषद हॉटेल जे. डब्ल्यु. मॅरिअट, सेनापती बापट मार्ग, लक्ष्मी सोसायटी, मॉडेल कॉलणी, शिवाजी नगर, पुणे येथे आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासह विभागीय आयुक्त कार्यालयाचे उप आयुक्त (विकास), जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) उपस्थित होते.

या दोन दिवसीय परिषदेचा शुभारंभ दिनांक ०७ ऑक्टोबर, २०२१ रोजी मा. मंत्री, ग्रामविकास, श्री. हसन मुश्रीफ यांच्या शुभहस्ते व मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला

दिनांक ०७ व ०८ ऑक्टोबर, २०२१ रोजी मा.अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार यांनी ग्रामविकास विभागाच्या विविध योजनांचा आढावा व स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत ग्रामविकास विभागा मार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमाचा आढावा घेतला. तसेच संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ.राजाराम दिघे यांनी उपस्थितांना सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रगती बाबत सादरीकरण केले. त्याचप्रमाणे राज्यात स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव अंतर्गत ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रगतीसाठी राबवावयाचे उपक्रम याबाबत सादरीकरण व मार्गदर्शन केले.






## राज्यस्तरीय क्षमता बांधणी शुभारंभीय कार्यशाळा

महाराष्ट्र राज्यात दिनांक २० नोव्हेंबर, २०२१ रोजीच्या राष्ट्रीय आवास दिनाचे औचित्य साधून केंद्र व राज्य पुरस्कृत **सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या अंमलबजावणी मध्ये गतिमानता व गुणवत्ता वाढीसाठी दिनांक २० नोव्हेंबर २०२१ ते ३१ मार्च, २०२२ या कालावधीत 'महा आवास अभियान-ग्रामीण २०२१-२२'** राबविण्यात येत आहे. या अभियानाचा शुभारंभ **दिनांक २० नोव्हेंबर २०२१ रोजी** मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते नियोजित होते. परंतु काही कारणास्तव **'महा आवास अभियान-ग्रामीण २०२१-२२'** या अभियानाचा राज्यस्तरीय शुभारंभ **दिनांक २३ नोव्हेंबर २०२१ रोजी**, मंत्रालय मुंबई येथे मा. मंत्री, ग्रामविकास, श्री. हसन मुश्रीफ यांच्या शुभहस्ते व मा. राज्यमंत्री, ग्रामविकास व महसूल, श्री. अब्दुल सत्तार, मा. अतिरिक्त मुख्य सचिव ग्रामविकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

या कार्यशाळेला दूरदृष्य प्रणालीव्दारे सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद), प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा), राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी, बँक प्रतिनिधी, मिडीया प्रतिनिधी व ग्रामविकास विभागातील अधिकारी/कर्मचारी, इ. उपस्थित होते.

या कार्यशाळेचे सुत्र संचालन उपसंचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, श्री. नीलेश काळे यांनी केले. या कार्यशाळेचे सुरूवातीला मा. मंत्री, ग्रामविकास, श्री. हसन मुश्रीफ यांचे स्वागत मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार यांनी केले. मा. राज्यमंत्री, ग्रामविकास व महसूल, श्री. अब्दुल सत्तार हे दूरदृष्य प्रणाली व्दारे विभागीय आयुक्त कार्यालय पुणे येथे उपस्थित होते. त्यांचे स्वागत विभागीय आयुक्त



पुणे यांनी केले. त्याचप्रमाणे मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार यांचे स्वागत संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांनी केले.

**'महा आवास अभियान-ग्रामीण २०२१-२२'** या अभियानाचे उद्देश, अभियान कालावधीत राबविण्यात येणारे उपक्रम, अभियान कालावधीत भागधारकांसाठी क्षमता बांधणी उपक्रम, अभियानाची प्रचार, प्रसिध्दी व जन-जागृतीसाठी राबविण्यात येणारे माहिती, शिक्षण व संवाद उपक्रम, अभियानाची प्रभावी, अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन करीता समित्यांची रचना, अभियान कालावधीत उत्कृष्ट काम करणारे व्यक्ती किंवा संस्था यांची नामांकन निवड गुणांकन पध्दती व निवड समिती, इ. बाबतची सविस्तर माहिती डॉ. राजाराम दिघे यांनी आपल्या प्रस्ताविक व सादरीकरणातून देवून उपस्थितांना मार्गदर्शन व क्षमता बांधणी केली. या सादरीकरणामध्ये त्यांनी महा आवास अभियान-ग्रामीण २.० व राज्यात राबविण्यात येणाऱ्या सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजना विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनतर अभियानाच्या जन-जागृतीसाठी तयार करण्यात आलेले अभियानाचे पोस्टर व घडी पुस्तिकीचे प्रकाशन व लाभार्थ्यांच्या शंकाचे समाधान करणारे महा आवास हेल्प लाईन क्रमांकाचा शुभारंभ मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

**'महा आवास अभियान-ग्रामीण २०२१-२२'** राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळेप्रसंगी मा. अतिरिक्त मुख्य सचिव ग्रामविकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार, मा. राज्यमंत्री, ग्रामविकास व महसूल, श्री. अब्दुल सत्तार व मा. मंत्री, ग्रामविकास, श्री. हसन मुश्रीफ यांनी उपस्थितांना अभियाना विषयी मार्गदर्शन केले. तसेच अभियानाच्या यशस्वीतेसाठी सर्व पदाधिकारी, शासकीय/ निमशासकीय अधिकारी व कर्मचारी यांना आवाहन केले.

संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांनी मान्यवर व सर्व उपस्थितांचे आभार मानून मा. अध्यक्षांच्या परवानगीने राज्यस्तरीय कार्यशाळा संपन्न झाल्याचे जाहिर केले.




## विभागस्तरीय क्षमता बांधणी कार्यशाळा

राज्यातील सर्व विभागांमध्ये **दिनांक २१ नोव्हेंबर, २०२१ ते २७ नोव्हेंबर, २०२१ या कालावधीत** संबंधित विभागीय आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली विभागातील सर्व जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद), अतिरिक्त आयुक्त/उपायुक्त (आदिवासी विकास, सामाजिक न्याय, कामगार) यांचे उपस्थितीत विभागस्तरीय कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळांना प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा), प्रकल्प अधिकारी (एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प), सहाय्यक आयुक्त (समाज कल्याण), उप जिल्हा कार्यकारी अधिकारी (महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ), जिल्हा माहिती अधिकारी, गट विकास अधिकारी, विभागीय कार्यालयातील संबंधित अधिकारी/कर्मचारी, बँक प्रतिनिधी, मिडीया प्रतिनिधी, इ. यांना अभियानाबाबत मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेचे आयोजन व अभियानाचे सादरीकरण उप आयुक्त (विकास) यांनी केले. कार्यशाळेस राज्यस्तरावरुन राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे अधिकारी निरीक्षक म्हणून उपस्थित होते.



## जिल्हास्तरीय क्षमता बांधणी कार्यशाळा

राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये **दिनांक २८ नोव्हेंबर, २०२१ ते ०४ डिसेंबर, २०२१ या कालावधीत** संबंधित जिल्ह्यांचे मा. पालकमंत्री यांचे अध्यक्षतेखाली व मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद यांचे प्रमुख उपस्थितीत आणि मा. खासदार, मा. आमदार, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद), प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा), प्रकल्प अधिकारी (एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प), सहाय्यक आयुक्त (समाज कल्याण), उप जिल्हा कार्यकारी अधिकारी (महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ) यांच्या उपस्थितीत जिल्हास्तरीय कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळांना जिल्ह्यातील सर्व पंचायत समिती

सभापती, उपसभापती, गट विकास अधिकारी, तहसिलदार, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयातील संबंधित अधिकारी/कर्मचारी, तालुकास्तरीय डाटा एन्ट्री ऑपरेटर, बँक प्रतिनिधी, मिडीया प्रतिनिधी, इ. यांना अभियानाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यशाळेचे आयोजन व अभियानाचे सादरीकरण प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा) यांनी केले. सदर कार्यशाळेस विभागस्तरावरील अधिकारी हे निरिक्षक म्हणून उपस्थित होते.



## तालुकास्तरीय क्षमता बांधणी कार्यशाळा

राज्यातील जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये **दिनांक ०५ डिसेंबर, २०२१ ते ११ डिसेंबर, २०२१** या कालावधीत संबंधित तालुक्याचे मा. आमदार यांचे अध्यक्षतेखाली तसेच पंचायत समिती सभापती, उपसभापती, जिल्हा परीषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, गट विकास अधिकारी, तहसिलदार यांच्या उपस्थितीत तालुकास्तरीय कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळांना तालुक्यातील सर्व सरपंच, ग्रामसेवक, तलाठी, पंचायत समिती कार्यालयातील संबंधित अधिकारी/कर्मचारी, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, बँक प्रतिनिधी, मिडीया प्रतिनिधी, इत्यादींना अभियानाबाबत मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेचे आयोजन व अभियानाचे सादरीकरण गट विकास अधिकारी (पंचायत समिती) यांनी केले. सदर कार्यशाळेस जिल्हास्तरावरील संपर्क अधिकारी हे निरिक्षक म्हणून उपस्थित होते.



## ग्रामस्तरीय क्षमता बांधणी कार्यशाळा

राज्यात सर्वत्र **दिनांक १२ डिसेंबर, २०२१ ते १८ डिसेंबर, २०२१ या कालावधीत** गावस्तरावर संबंधित ग्रामपंचायतीचे सरपंच यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामपंचायत सदस्य व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत ग्रामस्तरीय कार्यशाळा आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेचे आयोजन व अभियानाचे सादरीकरण ग्रामसेवक, तलाठी यांनी केले. तसेच उपस्थितांना अभियानाबाबत सखोल मार्गदर्शन केले.

या कार्यशाळाद्वारे 'महा आवास अभियान-ग्रामीण २०२१-२२' चे यशस्वी अंमलबजावणीसाठी मिळालेली माहिती सर्व लाभार्थी यांना देवून गावातील गतिमान अंमलबजावणीबाबतचे नियोजन करण्यात आले. सदर कार्यशाळेस तालुकास्तरावरील संपर्क अधिकारी हे निरिक्षक म्हणून उपस्थित होते.

या ग्रामस्तरीय कार्यशाळेमध्ये प्रत्येक ग्रामपंचायती मध्ये **'ग्राम कृती गटाचे गठन'** करण्यात आले. यामध्ये गावातील प्रभावी व्यक्ती, युवक/युवती, (उदा. सरपंच, ग्रामसेवक, पोलीस पाटील, शिक्षक, पोलीस इ. प्रभावी व्यक्ती) इत्यादींचा समावेश ग्राम कृती गटामध्ये करण्यात आला. या गटाने 'महा आवास अभियान-ग्रामीण २०२१-२२' मध्ये गावस्तरावर केल्या जाणाऱ्या व करावयाच्या प्रत्यक्ष उपाय योजनांचा पाठपुरावा करुन अभियान १०० टक्के यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करावयाचे आहे. त्यानुसार सदर ग्राम कृती गटांची वाटचाल सुरू आहे.

## लाभार्थी मेळावे व बँक मेळावे

गावोगावी लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत लाभार्थ्यांचे मेळावे आयोजित करुन लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम व दर्जाबाबत मार्गदर्शन, प्रोत्साहन देणे, तसेच लाभार्थ्यांना घरकुल मंजूरी पत्र वितरण करणे, घरकुलाचे भूमिपूजन कार्यक्रम आयोजित करणे, घरकुलांचे हप्ते वितरण कार्यक्रम करणे, गृहप्रवेश कार्यक्रम करणे, इ. सारखे उपक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमामुळे घरकुल लाभार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.



तसेच तालुकास्तरावर/ गावोगावी बँक अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत घरकुल बांधकामासाठी गृहकर्ज घेवू इच्छिणाऱ्या लाभार्थ्यांसाठी बँक मेळाव्याचे आयोजन करुन गृह कर्ज उपलब्धतेसाठी प्रयत्न सुरू आहे.

## ग्रामीण गवंडी प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या प्रशिक्षणार्थींचे मूल्यांकन (Assessment)

महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत राज्यात घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ग्रामीण गवंडी प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्दिष्ट प्रशिक्षण देणाऱ्या संस्था (Training Provider) यांच्याशी समन्वय ठेवून पूर्ण करुन कुशल गवंडी तयार करण्याचे काम प्रगती पथावर आहे.

अभियान कालावधीत ग्रा.पं. तन्नु, ता. इंदापूर, जि. पुणे, ग्रा.पं. उमरी, ता.जि. परभणी, ग्रा.पं. सावरगांव मुंढे, ता. लोणार, जि. बुलढाणा व ग्रा.पं. माणिकडोह, ता. पुसद, जि. यवतमाळ, इ. ठिकाणी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ग्रामीण गवंडी प्रशिक्षणाच्या उद्दिष्टानुसार **गवंडी प्रशिक्षण पूर्ण करुन त्यांचे मुल्यांकन(Assessment) त्वरीत पूर्ण करण्यात आले.**

प्रशिक्षित ग्रामीण गवंडी व ग्रामपंचायत क्षेत्रातील इतर उपलब्ध गवंडी यांची ग्रामपंचायतनिहाय यादी तयार करुन त्यांचे पॅनेल तयार करण्यात येत असून या **पॅनेलमधील गवंड्यांचा ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील घरकुलांच्या बांधकामात सहभाग घेण्यात येणार आहे.**



## राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाच्या कर्मचाऱ्यांच्या क्षमता बांधणीसाठी अभ्यास दौरा व कार्यशाळा

राज्यात केंद्र व राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामांमध्ये गतिमानता आणण्यासाठी राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयामार्फत दिनांक २० नोव्हेंबर २०२१ ते ३१ मार्च २०२२ या कालावधीत **'महा आवास अभियान-ग्रामीण २०२१-२२'** राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व घरकुल बांधकामाबाबत माहिती देण्यासाठी राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयातील कर्मचाऱ्यांसाठी दिनांक १० ते १२ डिसेंबर, २०२१ या कालावधीत कोकण विभागाचे संपर्क प्रमुख तथा राज्य व्यवस्थापन कक्षाचे प्रभारी सहाय्यक संचालक (लेखा), श्री. संजय घोगळे व राज्य व्यवस्थापन कक्षाचे वास्तुविशारद, श्री. परमेश्वर शेलार यांच्यासह एकुण १२ अधिकारी/कर्मचारी कोकण विभागातील रायगड व रत्नागिरी जिल्ह्याचा दौरा केला.

दिनांक १० डिसेंबर, २०२१ रोजी अभ्यास दौऱ्याच्या सुरूवातीला राज्य व्यवस्थापन कक्षातील अधिकारी/कर्मचारी यांनी रायगड जिल्ह्यातील पंचायत समिती पेण व माणगाव येथील डेमो हाऊस व पेण तालुक्यातील बोरगाव ग्रामपंचायतीला भेट दिली. दिनांक ११ डिसेंबर, २०२१ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील पंचायत समिती दापोली येथे डेमो हाऊसला भेट व पंचायत समिती दापोलीच्या अधिकारी/कर्मचारी यांनी राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाच्या कर्मचाऱ्यासाठी ६ बंडल सिस्टीम, आस्थापना विषयक कामकाज हाताळणे व तालुकास्तरीय ग्रामीण गृहनिर्माण योजनांची अंमलबजावणी पध्दती, इ. विषयी कार्यशाळेचे आयोजन केले. दिनांक १२ डिसेंबर, २०२१ रोजी रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यामधील तळाशेत ग्रामपंचायतीला भेट दिली.

या अभ्यास दौरा व कार्यशाळेच्या माध्यमातून राज्य व्यवस्थापन कक्षातील कर्मचारी यांना डेमो हाऊसची बांधणी व त्याचे फायदे, ग्रामस्तरावर लाभार्थी निवड, ग्रामसभा, घरकुल ले-आऊट, बांधकामाचे विविध टप्पे व निधी वितरण, गावातील घरकुलांची पहाणी व लाभार्थ्यांना गृह भेटी दरम्यान त्यांच्या अडचणी विषयी माहिती मिळाली.

या अभ्यास दौरा व कार्यशाळेमुळे मोठ्या प्रमाणात क्षमता बांधणी झाली असल्याचे राज्य व्यवस्थापन कक्षातील अधिकारी/कर्मचारी यांनी सांगितले.



## मा. मंत्री, ग्रामीण विकास व पंचायत राज, भारत सरकार यांच्या अध्यक्षतेखाली प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण च्या कामांचा आढावा

मा. मंत्री, ग्रामीण विकास व पंचायत राज, भारत सरकार, श्री. कपील मोरेश्वर पाटील यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १२ नोव्हेंबर, २०२१ रोजी मुंबई येथे प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, रूरबन मिशन, राष्ट्रीय ग्रामीण जिवनोन्नती अभियान, १४ वा वीत्त आयोग व स्वामित्व योजना, इ. ग्रामीण विकास व पंचायत राज योजनांचा आढावा घेण्यात आला.

या बैठकीला मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार, संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

सदर बैठकीमध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत सुरू असलेल्या कामांच्या प्रगती बाबत सविस्तर माहिती व सादरीकरण डॉ. राजाराम दिघे यांनी केले. त्याचप्रमाणे राज्यात ग्रामविकास व पंचायत राज विभागा मार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांची माहिती व केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण त्यासोबतच राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण आवास योजनाच्या गतिमानता व गुणवत्तेसाठी राज्यात राबविण्यात येत असलेल्या महा आवास अभियान-ग्रामीण बाबत मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार यांनी सविस्तर माहिती मा. मंत्री, ग्रामीण विकास व पंचायत राज, भारत सरकार, श्री. कपील मोरेश्वर पाटील यांना सांगितली.



## मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग यांच्या अध्यक्षतेखाली मुख्य कार्यकारी अधिकारी यांची आढावा बैठक

मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांच्या उपस्थितीत राज्यातील सर्व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांचे प्रकल्प संचालक यांची आढावा बैठक दि. ०९ डिसेंबर, २०२१ रोजी बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई येथे व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे संपन्न झाली.

बैठकीच्या सुरूवातीला दिनांक २६ नोव्हेंबर, २०२१ रोजी मा. अतिरिक्त सचिव, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत कायम स्वरुपी प्रतिक्षा यादी (PWL) व आवास प्लस मधील घरकुल मंजूरी बाबत मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांच्याकडे दूरध्वनीद्वारे नाराजी व्यक्त केल्याचे सांगितले.

त्यानंतर संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांनी महा आवास अभियान २.० च्या अंमलबजावणी व सद्यास्थितीबाबत सादरीकरण केले. यानुसार अभियान कालावधीत राबविण्यात येत असलेल्या १० उपक्रमांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. तसेच आवास प्लस प्रपत्र ड यादीमधून सन २०२१-२२ च्या उद्दिष्टानुसार घरकुलांना मंजूरी देण्याच्या सूचना दिल्या.

मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग यांनी बैठकीस उपस्थित सर्वांना पुढील प्रमाणे कार्यवाही करण्याच्या सुचना दिल्या.

१) प्रत्येक जिल्हयाला स्वत:चे वॉर्ड रुम तयार करून यापुढे प्रत्येक जिल्हयाने आपल्या वॉर्ड रुम मध्ये बैठका कराव्या.

२) इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात एक घरकुल पूर्ण करण्यासाठी जास्त कालावधी लागणे ही अत्यंत खेदाची बाब आहे. घरकुल पूर्ण करण्याचा कालावधी कसा कमी करता येईल याचा विचार प्रत्येक जिल्हयाने करावा.

३) ग्रामपंचायत स्तरावर बांधकाम साहित्याची उपलब्धता केल्यामुळे घरकुले कमी वेळेत पूर्ण होण्यास मदत होईल.

४) घरकुल मंजूर झाल्यानंतर लाभार्थ्यांना ७ दिवसाचे आत



पहिला हप्ता वितरीत करणे आवश्यक आहे.
५) जिल्हयास्तरावर एका डेमो हाऊसची उभारणी करावी.
६) मंजूर घरकुले १०० ते १२० दिवसात पूर्ण करण्याचे नियोजन करावे.
७) सर्व गटविकास अधिकारी यांनी डेटा एन्ट्री ऑपरेटर, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, सरपंच व ग्रामसेवक यांचा नियमित आढावा घेणे आवश्यक आहे.
८) प्रपत्र ड मधील घरकुले तात्काळ मंजूर करावी.
९) मिस मॅच, डेटा एन्ट्री, सी + लॉगीन जर प्रत्येक पातळीवर दिले तर काम लवकर पूर्ण होणे गरजेचे आहे.
१०) महाआवास अभियानांर्तगत विभाग, जिल्हा, तालुका व ग्रामस्तरावर उत्कृष्ट काम करणाऱ्यांना पुरस्कार देवून त्यांना गौरविण्यात येणार आहे.

अशा प्रकारच्या सूचना देत मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग यांनी असे सांगितले की, **"आता महाराष्ट्राची कामाची गती मंदावलेली आहे, त्यामुळे इतर राज्यांच्या तुलनेत आपण मागे आहोत, त्यात सुधारणा करणे आवश्यक आहे."** याबाबत पुढील बैठकीत आढावा घेणार असल्याचे सांगितले. तसेच ज्या जिल्ह्यांची प्रगती असमाधानकारक आहे, अशांना कामात सुधारणा करण्याच्या सूचना दिल्या.

बैठकीच्या शेवटी सर्व उपस्थितांचे आभार मानून मा. अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपन्न झाल्याचे संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ. राजाराम दिघे यांनी जाहीर केले.



## महा आवास अभियान-ग्रामीणच्या प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठका

राज्यात दिनांक २० नोव्हेंबर, २०२१ पासून महा आवास अभियान-ग्रामीण ची अंमलबजावणी सुरू आहे. अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनसाठी राज्यस्तरावरून संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांच्या अध्यक्षतेखाली व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून माहे आक्टोंबर २०२१, नोव्हेंबर २०२१ व डिसेंबर २०२१ या कालावधीत राज्यातील सर्व उप आयुक्त (विकास), प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा), उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), गट विकास अधिकारी (पंचायत समिती) व सहाय्यक लेखाधिकारी (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा) यांच्या नियमित आढावा बैठकांचे आयोजित करण्यात आले होते.

सदर बैठकांमध्ये महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या १० उपक्रमांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. तसेच अभियान कालावधीत घरकुलांना मंजूरी देणे, अपूर्ण घरकुले पूण करणे व प्रलंबित घरकुले पूर्ण करणे याबाबत जिल्हा व तालुका निहाय आढावा घेतला. भूमिहीन लाभार्थ्यांना शासनाच्या विविध योजनांद्वारे जागा उपलब्ध करुन घरकुलांना मंजूरी व जेथे काही पर्याय नाही अशी घरकुले रद्द करण्याबाबत संचालक यांनी उपस्थितांना सूचित केले.

घरकुले पूर्ण करण्यासाठी ग्रामसेवक व ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांचा सहभाग महत्वाचा आहे. घरकुल मंजूर झाल्यानंतर पूर्ण होण्याचा कालावधी हा ३५७ दिवसांचा आहे. साधरणत: १०० ते १२० दिवसात घरकुल पूर्ण होणे अपेक्षित असून याकरीता घरकुल मंजूर झाल्यानंतर लाभार्थ्याला पहिला हप्ता वेळेवर देणे आवश्यक असल्याचे डॉ. राजाराम दिघे यांनी सांगितले.

अभियान कालावधीत तालुकास्तरीय डेमो हाऊसमध्ये कॉप शॉप सुरु करणे, जिल्हास्तरावर डेमो हाऊस उभारणी, महा आवास अभियान २.० अंतर्गत विभाग, जिल्हा, तालुका व ग्रामस्तरीय कार्यशाळा पूर्ण करणे, प्रत्येक गावात ग्राम कृती गटाचे गठन करणे, लाभार्थ्यांसाठी लाभार्थी मेळावे व बँक मेळावे आयोजित करणे, अभियानाच्या प्रचार, प्रसिध्दी व जन-जागृतीसाठी विभाग, जिल्हा, तालुका व ग्रामस्तरावर होर्डिंग, बॅनर व पोस्टर लावणे, नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत बहुमजली



इमारती उभारणे, गृह संकुले उभारणे, हाऊसिंग अपार्टमेंट उभारणे, घरकुल बांधकामासाठी वाळूला पर्याय म्हणून क्रश सॅन्ड, सिमेंट ब्लॉक, फ्लाय ॲश ब्रिक्स, इंटर लॉकिंग ब्रिक्स, हॉलो ब्रिक्स इत्यादींचा वापर करणे, घरकुल बांधकामामध्ये फरशी अथवा लादी, रंगरंगोटी, किचन गार्डन / परसबाग, रेन हार्वेस्टिंग, सौरउर्जा साधने व नेट बिलींग इ. चा वापर करणे व ज्या जिल्हा व तालुक्याचे काम मागे आहे त्यांना कामात सुधारणा करण्याच्या सुचना संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांनी उपस्थितांना केल्या.

## महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या गतिमानता व गुणवत्ता वाढीसाठी राज्यस्तरीय अधिकाऱ्यांच्या क्षेत्रीय भेटी

सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामात गतिमानता व गुणवत्ता वाढीसाठी राज्यात दिनांक २० नोव्हेंबर, २०२१ पासून 'महा आवास अभियान-ग्रामीण' राबविण्यात येत आहे. अभियान कालावधीत अंमलबजावणी यंत्रणामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचे संनियंत्रण व मूल्यमापन करण्यासाठी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांनी राज्यातील ६ महसूली विभागाकरीता राज्य व्यवस्थापन कक्षातील ६ अधिकाऱ्यांची संपर्क अधिकारी म्हणून निवड केली आहे. यामध्ये नागपूर विभागाकरीता उपसंचालक, श्री. नीलेश काळे, पुणे विभागाकरीता उपसंचालक, श्रीमती मंजिरी टकले, कोकण विभागाकरीता प्र. सह संचालक (लेखा), श्री. संजय घोगळे, औरंगाबाद विभागाकरीता राज्य समन्वयक, श्री. राम आघाव, नाशिक विभागाकरीता प्रशिक्षण समन्वयक, श्री. संतोष पानसरे व अमरावती विभागाकरीता प्रशिक्षण समन्वयक, श्री. मधुकर वाघ यांची निवड करण्यात आली आहे.

दिनांक २७ ते २९ ऑक्टोंबर, २०२१ या कालावधीत राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण कार्यालयाचे अधिकारी डॉ. संघरत्न सोनवणे (राज्य संनियंत्रण व मूल्यमापन समन्वयक) व श्री. मधुकर वाघ (प्रशिक्षण समन्वयक) यांनी नाशिक, नंदुरबार व जळगांव जिल्ह्याचा दौरा केला. या दौऱ्या दरम्यान त्यांनी या तीन्ही जिल्ह्यात प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांच्या उपस्थितीत संबंधित जिल्ह्यातील ग्रामीण गृहनिर्माण सबंधित अधिकारी/कर्मचारी यांचा आढावा घेतला व ग्रापंचायतींना क्षेत्रीय भेटी देवून विविध आवास योजनांच्या कामांची पहाणी व घरकुल लाभार्थ्यांना मार्गदर्शन केले.




अमरावती विभागाचे संपर्क प्रमुख श्री. मधुकर वाघ यांनी दिनांक २२ व २३ डिसेंबर, २०२१ रोजी अमरावती, २४ डिसेंबर, २०२१ रोजी अकोला व २५ डिसेंबर, २०२१ रोजी बुलढाणा जिल्ह्याचा दौरा केला. या दौरा कार्यक्रमा दरम्यान श्री. मधुकर वाघ यांनी प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांच्या उपस्थितीत ग्रामीण आवास योजनेशी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्या आढावा बैठका घेतल्या. याबैठकीमध्ये ग्रामीण गृहनिर्माण अभियंते यांच्या अडचणीवर सकारात्मक चर्चा करून कामावर हजर होणे कामी प्रवृत्त केले. तसेच पंचायत समिती आवारातील डेमो हाऊसची पहाणी व डेमो हाऊसेस मध्ये कॉप-शॉप सुरू करणे बाबत मार्गदर्शन केले. ग्रामपंचायतींना क्षेत्रीय भेट देवून आवास योजनांच्या कामाची पहाणी, घरकुल लाभार्थ्यांना ग्रामीण गृहनिर्माण योजना व विविध शासकीय जागा खरेदी योजनांबाबत मार्गदर्शन केले. महा आवास अभियानाच्या प्रचार, प्रसिध्दी व जन-जागृतीसाठी राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाकडून अभियानाचे होर्डिंग, बॅनर व पोस्टर, इ. ची निर्मिती करण्यात आली आहे. सदरचे साहित्य विभाग, जिल्हा, तालुका व ग्रामपंचायतस्तरावर प्रिटींग करून लावले आहे.





याबाबतची तपासणी श्री. मधुकर वाघ यांनी केली.

औरंगाबाद विभागाचे संपर्क प्रमुख श्री. राम आघाव यांनी दिनांक २४ डिसेंबर, २०२१ रोजी परभणी जिल्ह्याचा दौरा केला. या दौरा कार्यक्रमा दरम्यान श्री. राम आघाव यांनी जिल्हा परिषद, परभणीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री शिवानंद टाकसाळे यांच्या अध्यक्षतेखाली व प्रकल्प संचालक, श्रीमती रश्मी खांडेकर व श्री. राम आघाव यांच्या प्रमुख उपस्थितीत महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत विविध उपक्रमांचा आढावा घेतला. तसेच आवास प्लस / Awaas Soft बाबतच्या तांत्रिक अडचणी सोडवणुकीसाठी सर्व गटविकास अधिकारी तसेच घरकुल योजनेशी संबंधित सहाय्यक लेखाधिकारी, विस्तार अधिकारी (सांख्यिकी), संबंधित लिपिक, डेटा एन्ट्री ऑपरेटर व ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांची कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी श्री. राम आघाव यांनी आवास सॉफ्ट व आवास प्लस मधील तांत्रिक अडचणी बाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले.

श्री. राम आघाव यांनी पंचायत समिती परभणी अंतर्गत मौजे उमरी येथील ग्रामपंचायतीला क्षेत्रीय भेट देवून घरकुलांची पाहणी, घरकुल लाभार्थ्यांना मार्गदर्शन व ग्रामीण गवंडी प्रशिक्षण कार्यक्रमास भेट दिली.






## महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत जास्तीत जास्त घरकुलांचे बांधकाम पूर्ण करावे

### - डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. यवतमाळ

आझादी का अमृत महोत्सव व महा आवास अभियान ग्रामीण २.० या शासनाच्या महत्वाकांशी कार्यक्रमांचा आढावा घेण्यासाठी व कामांची पहाणी करण्याकरीता दिनांक २९ डिसेंबर, २०२१ रोजी यवतमाळ जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, डॉ. श्रीकृष्ण पांचाळ व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, श्री. विनय ठमके यांनी यवतमाळ जिल्ह्य़ातील पुसद व दिग्रस तालुक्यांचा दौरा केला.

या दौरा कार्यक्रमा दरम्यान यवतमाळ जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या अध्यक्षतेखाली व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, श्री. विनय ठमके यांच्या प्रमुख उपस्थितीत पुसद व दिग्रस तालुक्यातील गट विकास अधिकारी, पंचायत समिती अंतर्गत सर्व विस्तार अधिकारी, शाखा अभियंते, ग्रामीण गृहनिर्माण अभियंते, डेटा एन्ट्री ऑपरेटर, ग्रामसेवक व इतर संबंधित अधिकारी/कर्मचारी यांची आढावा बैठक घेण्यात आली. सदर आढावा बैठकीमध्ये आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत विविध उपक्रमांचा आढावा घेण्यात आला. त्याचप्रमाणे महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांचा व सर्व ग्रामीण आवास योजनांचा ग्रामपंचायत निहाय आढावा घेण्यात आला. अभियान कालावधीत जास्तीत जास्त घरकुलांचे बांधकाम पूर्ण करण्याचे आवाहन डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी सर्व उपस्थितांना केले.

डॉ. श्रीकृष्ण पांचाळ व श्री. विनय ठमके यांनी पुसद तालुक्यातील चोंडी व व दिग्रस तालुक्यातील रुई तलाव या ग्रामपंचायतींना क्षेत्रीय भेटी दिल्या. या भेटी दरम्यान डॉ. श्रीकृष्ण पांचाळ व श्री. विनय ठमके यांनी घरकुल लाभार्थ्यांना गृह भेटी दिल्या. या गृह भेटी दरम्यान डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी अपूर्ण घरकुल का अपूर्ण आहे?, तुम्हाला नरेगा अंतर्गत मजूरी मिळाली का?, नरेगा अंतर्गत शोष खड्डा बांधला का?, शौचालय बांधले का?, घरकुलाचे नेमके किती पैसे मिळाले? या बाबत थेट लाभार्थांना विचारणा केली. घरकुल मंजूरी व तात्काळ हप्त्याचे वितरण करण्याच्या सूचना डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी गट विकास अधिकारी व संबधित अधिकारी यांना दिल्या.



## महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामांची पाहणी व आढावा

**- श्रीमती शालिनी कडू, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पुणे**

महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत विविध आवास योजनांच्या कामात गतिमानता व गुणवत्ता वाढीसाठी दिनांक २५ नाव्हेंबर, २०२१ प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पुणे, श्रीमती शालिनी कडू यांनी पंचायत समिती मावळ येथे भेट दिली .

पंचायत समिती मावळ येथील भेटी दरम्यान श्रीमती शालिनी कडू यांनी गट विकास अधिकारी यांच्या उपस्थितीत पंचायत समिती अंतर्गत येणारे सर्व ग्रामसेवक, विस्तार अधिकारी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंते, शाखा अभियंता, डेटा एन्ट्री ऑपरेटर, ग्रामीण आवास योजनेशी संबंधित इतर अधिकारी व कर्मचारी यांची आढावा बैठक घेतली. या बैठकीमध्ये महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांचा व सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रगतीचा गावानिहाय आढावा घेतला. तसेच आवास प्लस प्रपत्र ड यादीमधून सन २०२१-२२ च्या उद्दिष्टानुसार घरकुलांना मंजूरी देण्याच्या सूचना बैठकीला उस्थितांना दिल्या.

श्रीमती शालिनी कडू यांनी पंचायत समिती आवारातील डेमो हाऊसची पहाणी करून कॉप-शॉप उभारणी बाबत तात्काळ कार्यवाही करण्याचे आदेश गट विकास अधिकारी यांना दिले. तसेच त्यांना पंचायत समिती मावळ अंतर्गत काही गावांना क्षेत्रीय भेटी देवून घरकुलांची पाहणी केली. घरकुल लाभार्थ्यांच्या गृह भेटी दरम्यान त्यांना ग्रामीण आवास योजनांबाबत मार्गदर्शन करून त्यांना घरकुल बांधकामासाठी प्रोत्साहीत केले. भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्धतेसाठी सरपंच, ग्रामसेवक, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ यांच्याशी चर्चा केली.

यावेळी गट विकास अधिकारी, श्री. सुधीर भागवत, विस्तार अधिकारी, श्रीमती शुभांगी भूमकर व इतर पंचायत समितीचे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.







## घरकुल निर्मितीसाठी शासकीय यंत्रणेबरोबरच समाजातील सर्व घटकांचे सहकार्य आवश्यक

**- श्री. नीलेश काळे, उपसंचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण**

दिनांक २२ नोव्हेंबर, २०२१ रोजी राज्य व्यवस्थापन कक्ष -ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे उपसंचालक श्री. नीलेश काळे यांनी हणमंतवाडी (तालुका फलटण, जिल्हा सातारा) ग्रामपंचायतीला क्षेत्रीय भेट दिली. या क्षेत्रीय भेटी दरम्यात गावातील विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांचा आढावा व ग्रामस्थांना मार्गदर्शन केले.

उपसंचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष -ग्रामीण गृहनिर्माण, श्री. नीलेश काळे यांनी गावातील प्रगतीत असलेल्या व पूर्ण झालेल्या विविध आवास योजनेंच्या घरकुलांना भेटी दिल्या. तसेच प्रलंबित घरकुले, अपूर्ण घरकुले व मंजूर घरकुले असलेल्या लाभार्थ्यांना गृह भेटी देवून घरकुल बांधकामासाठी मार्गदर्शन केले. घरकुल बांधकाम करतांना शासकीय यंत्रणेबरोबर समाजातील सर्व घटक जसे पंचायतराज संस्था, स्वयंसेवी संस्था, सहकारी संस्था, खाजगी संस्था, तंत्र शिक्षण संस्था, बँका, लोकप्रतिनिधी, लाभार्थी ग्रामस्थ इ. यांचा सक्रिय सहभाग वाढवून सर्व नागरिक सुविधायुक्त आदर्श घरकुलांची निर्मिती करावी. त्याचप्रमाणे ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील लाभार्थ्यांना शासनाच्या इतर योजनांशी कृतीसंगमातून लाभ द्यावा. महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रचार, प्रसिध्दी व जन-जागृती करून लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी प्रोत्साहीत करण्याचे आवाहन श्री. नीलेश काळे यांनी केले. ग्रामपंचायत हणमंतवाडी अंतर्गत झालेल्या कामाची पाहणी करून ग्रामीण गृहनिर्माण समितीच्या कामाचे विशेष कौतुक उपसंचालक, श्री. नीलेश काळे यांनी केले.



## शबरी आवास योजनेत रायगड जिल्ह्याची उल्लेखनीय कामगिरी

दिनांक २३ नोव्हेंबर, २०२१ रोजी विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रगती विषयी जिल्हा परिषद रायगडचे मुख्य कार्यकारी अधिकारी व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याशी झालेल्या चर्चेनुसार रायगड जिल्ह्यात शबरी आवास योजनेंतर्गत उल्लेखनीय कामगिरी करण्यात आली असल्याचे सांगितले. तसेच सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाकरिता रायगड जिल्ह्याला ५४७ घरकुलांचे उद्दिष्ट देण्यात आले होते. त्यानुसार जिल्ह्यातील ५४७ आदिवासी लाभार्थ्यांच्या घरकुलांना प्रशासकीय मंजूरी देण्यात आली असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. रणधीर सोमवंशी यांनी दिली.

सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाकरिता शबरी आवास योजने अंतर्गत राज्य शासनाने रायगड जिल्ह्याला ५४७ घरकुलांचे उद्दिष्ट दिले होते. त्यापैकी ५४७ आदिवासी लाभार्थ्यांना प्रशासकीय मंजूरी देण्यात आली असून राज्यात रायगड जिल्ह्याने ४६९ लाभार्थ्यांना संगणक प्रणालीवर मान्यता देऊन आघाडी घेतली असल्याचे श्री. रणधीर सोमवंशी यांनी सांगितले.

याकामी जिल्हा परिषद अध्यक्षा, श्रीमती योगिता पारधी, उपाध्यक्ष, श्री. सुधाकर घारे, अर्थ व बांधकाम सभापती, श्रीमती निलीमा पाटील, समाजकल्याण सभापती, श्री. दिलीप भोईर, महिला व बालकल्याण सभापती, श्रीमती गीता जाधव, कृषी व पशसंवर्धन सभापती, श्री. बबन मनवे यांच्यासह सर्व जिल्हा परिषद अधिकारी/कर्मचारी यांचे सहकार्य लाभले असल्याचे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रणधीर सोमवंशी यांनी सांगितले.



## चंदगड तालुक्यात 'लोक अदालत' च्या माध्यमातून प्रलंबित घरकुले पूर्ण

राज्यात महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत विविध उपक्रम राबवून ग्रामीण भागातील लोकांचे पक्क्या घरकुलाचे स्वप्न पूर्ण करण्यात येत आहे. परंतु काही घरकुल लाभार्थ्यांनी घरकुल मंजूर झाल्यावर पहिला हप्ता घेवून १२ महिन्यापेक्षा जास्त कालावधी उलटून अद्यापही घरकुल बांधकामास सुरूवात केली नाही. अशा लाभार्थ्यांना वारंवार बैठका, लाभार्थी मेळावे, गृह भेटी व इतर सर्व मार्गाने समजावण्याचा प्रयत्न करण्यात आले. परंतु सदर लाभार्थ्यांची घरकुल बांधकाम न करण्याची भूमिका जैसे थे आहे. अशा प्रलंबित घरकुल लाभार्थ्यांसाठी महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत गरजेप्रमाणे तालुका कायदेविषयक सहाय्य व सल्ला समितीच्या सहाय्याने **लोक अदालत** द्वारे लाभार्थ्यांना घरकुल पूर्ण करण्यासाठी प्रवृत्त करणे अपेक्षित आहे.

त्यानुसार महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड पंचायत समिती मधील प्रधानमंत्री आवास योजना व रमाई आवास योजना अंतर्गत घरकुल बांधकाम सुरू न केलेले व अपूर्ण घरकुले असलेले लाभार्थी यांची दि.११ डिसेंबर, २०२१ रोजी लोक न्यायालय दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर चंदगड येथे सुनावणीसाठी उपस्थित करण्यात आले. सदर घरकुल लाभार्थ्यांच्या सुनावण्या लोक न्यायालयामध्ये मा. न्यायाधीश, श्री. शिपकुले व चंदगड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, श्री. बोडरे यांच्या उपस्थित पार पडल्या.

लोक न्यायालयाने एकूण ४३० घरकुल लाभार्थ्यांना नोटीस बजावल्या होत्या, त्यापैकी १३२ लाभार्थी उपस्थित होते. यावेळी ४५ घरकुल पुर्ण असून ३८ लाभार्थी यांनी एक महिन्यात बांधकाम पुर्ण करणार व उर्वरित ४९ लाभार्थी एक ते दीड महिन्यामध्ये बांधकाम सुरू करणार असल्याचे न्यायालयात लेखी कळविले. त्यामुळे प्रलंबित घरकुले पूर्ण होण्यास व नवीन घरकुल बांधकामास गतिमानता आली आहे.

महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत **लोक अदालत** सारखा उपक्रम राबविल्यामुळे प्रलंबित घरकुल बांधकाम पूर्ण होण्यास मदत झाली असून नव्याने मंजूर झालेली घरकुले पहिला हप्ता मिळताच लाभार्थी तात्काळ बांधकाम करण्यास सुरूवात करीत आहे. हा उपक्रम खरोखर घरकुल बांधकामासाठी लाभदायक ठरत आहे.



## मा. मंत्री, ग्रामविकास यांच्या शुभहस्ते व मा. राज्यमंत्री, गृह यांच्या प्रमुख उपस्थितीत कोल्हापूर जिल्हास्तरीय महा आवास अभियान पुरस्काराचे वितरण

महा आवास अभियान-ग्रामीण २०२०-२१ अंतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणारे व्यक्ती किंवा संस्था यांना महा आवास अभियान पुरस्कार देवून गौरविण्यात येत आहे. त्यानुषंगाने दिनांक १ आक्टोंबर, २०२१ रोजी कोल्हापूर येथे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, कोल्हापूर यांनी जिल्हास्तरीय महा आवास अभियान पुरस्कार २०२०-२१ वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमांमध्ये अभियान कालावधीत प्रधानमंत्री आवास योजना व राज्य पुरस्कृत आवास योजना अंतर्गत उत्कृष्ट कामगिरी जिल्हास्तरीय सर्वोत्कृष्ट तालुके, सर्वोत्कृष्ट क्लस्टर, सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत यांना जिल्हास्तरीय महा आवास अभियान पुरस्कार २०२०-२१ चे वितरण मा. मंत्री, ग्रामविकास यांच्या शुभहस्ते व मा. राज्यमंत्री, गृह तथा कोल्हापूरचे पालकमंत्री, श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील यांच्या प्रमुख उपस्थित संपन्न झाले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती मा. मंत्री, ग्राम विकास व कामगार, श्री. हसन मुश्रीफ, मा. राज्यमंत्री, गृह तथा कोल्हापूरचे पालकमंत्री श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील यांच्यासह जिल्हा परिषद अध्यक्ष, मा.राहुल पाटील, मा. आमदार, श्री. जयवंत तासगावकर, मा. आमदार, श्री राजू आवळे, मा. आमदार, श्री. पी. एन पाटील, जिल्हाधिकारी, श्री. राहुल रेखावार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. संजयसिंह चव्हाण, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. आय. कुमार माने, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक, डॉ. रवी शिवदास, सहाय्यक प्रकल्प अधिकारी, श्री. ज्ञानदेव मडके, जिल्हा प्रोग्रामर श्री. चंद्रकांत पाटील व सर्व विभाग प्रमुख तसेच सर्व जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सभापती, उपसभापती ,सर्व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.




## महा आवास अभियान-ग्रामीण २०२१-२२ राज्यस्तरीय शुभारंभीय कार्यशाळे प्रसंगी विविध माहिती, शिक्षण व संवाद साहित्याचे प्रकाशन

दिनांक २३ नोव्हेंबर, २०२१ रोजी मा. मंत्री, ग्रामविकास यांच्या शुभहस्ते महा आवास अभियान-ग्रामीण २०२१-२२ चा राज्यस्तरीय शुभारंभ संपन्न झाला. या अभियानाच्या प्रचार, प्रसिध्दी व जन-जागृतीसाठी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाने अभियानाची स्टॅण्डी, स्वातंत्र्यांचा अमृत महोत्सव अंतर्गत राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालया मार्फत राबविण्यात येणारे उपक्रमाबाबतची स्टॅण्डी, राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळेसाठी बॅक ड्रॉप, अभियानाचे होर्डिंग, अभियानाचे बॅनर, अभियानाचे पोस्टर व अभियानाची घडी पुस्तिका, इ. माहिती, शिक्षण व संवाद साहित्याची निर्मिती केली.

या राज्यस्तरीय कार्यशाळेमध्ये मा. मंत्री, ग्रामविकास, श्री. हसन मुश्रीफ यांच्या शुभहस्ते व मा.राज्यमंत्री, ग्रामविकास व महसूल, श्री. अब्दुल सत्तार, मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांच्या प्रमुख उपस्थितीत अभियानाची घडी पुस्तिका व अभियानाचे पोस्टर यांचे प्रकाशन करण्यात आले. या घडी पुस्तिके मध्ये अभियानाची प्रस्तावना, अभियानाचे उद्देश, अभियान कालावधीत राबवावयाचे उपक्रम, क्षमता बांधणी कार्यक्रम,






माहिती, शिक्षण व संवाद कार्यक्रम, सर्व स्तरावरील अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समित्या, अभियान कालावधीत उत्कृष्ट काम करणारे व्यक्ती किंवा संस्था यांना प्रदान करावयाचे पुरस्कार व पुरस्कार निवडीचे निकष याबाबतची सविस्तर माहिती देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे पोस्टर मध्ये अभियानाचे उद्देश, अभियान कालावधीत राबवावयाचे उपक्रम व महा आवास अभियान पुरस्कार याबाबतची माहिती दिली आहे.

**'महा आवास अभियान-ग्रामीण २०२१-२२'** ची प्रचार, प्रसिध्दी व जन-जागृती विभाग, जिल्हा, तालुका व ग्रामस्तरावर जास्तीत जास्त प्रमाणात व्हावी, याकरीता राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाने निर्मिती केलेले होर्डिंग, बॅनर व पोस्टरचे डिजाईन सर्व स्तरावर इ-मेलव्दारे पाठवून प्रिटींग करून दर्शनीय ठिकाणी लावण्याच्या सूचना संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांनी सर्व अंमलबजावणी यंत्रणांना दिल्या.




## महा आवास अभियान-ग्रामीण २०२१-२२ राज्यस्तरीय शुभारंभीय कार्यशाळे प्रसंगी 'महा आवास हेल्पलाईन' चा शुभारंभ

राज्यात राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालया मार्फत केंद्र व राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांची अंमलबजावणी करण्यात येते. राज्यात ग्रामीण गृहनिर्माण योजनेच्या लाभार्थ्यांना त्यांचे घरकुल मंजूरी, हप्त्यांचे वितरण, घरकुल बांधकाम, जागा उपलब्धता, विविध आवास योजना व इतर अडचणी बाबत माहिती मिळावी व योग्य मार्गदर्शन व्हावे, यासाठी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांच्या संकल्पनेतून व बँक ऑफ महाराष्ट्र यांच्या सहकार्याने **'महा आवास हेल्प लाईन'** ची सुरूवात केली आहे. सदरची हेल्प लाईन दुरध्वनीच्या माध्यमातून असल्याने याकरीता राज्य व्यवस्थापन-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाने **टोल फ्री क्रमांक १८०० २२ २०१९** ची नोंदणी केली आहे. या क्रमांकावर संपर्क साधून घरकुल लाभार्थी किंवा कोणीही व्यक्ती ग्रामीण गृहनिर्माण योजने संबंधित माहिती घेवू शकतो. **'महा आवास हेल्प लाईन'** ची सुविधा हि फक्त कार्यालयीन वेळेत सुट्टीचे दिवस वगळून उपलब्ध असेल.

**'महा आवास हेल्प लाईन'** चा शुभारंभ मा. मंत्री, ग्रामविकास, श्री. हसन मुश्रीफ यांच्या शुभहस्ते व मा.राज्यमंत्री, ग्रामविकास व महसूल, श्री. अब्दुल सत्तार, मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला.




## भंडारा मध्ये कलापथकाच्या माध्यमातून विविध ग्रामीण आवास योजनाची जन-जागृती

महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत आझादी का अमृत महोत्सव निमित्त औचित्य साधुन दि. ८/११/२०२१ रोजी विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रचार, प्रसिध्दी व जन-जागृतीसाठी पंचायत समिती, भंडारा अंतर्गत ग्रामपंचायत कारधा येथे गट विकास अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामस्थ व घरकुल लाभार्थ्यांसाठी कलापथकाव्दारे पथनाट्याचे आयोजन करण्यात आले .

यावेळी ग्रामपंचायत कारधा येथील सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व गावकरी तसेच पंचायत समिती भंडारा येथील शाखा सहाय्यक, ग्रामीण गृहनिर्माण अभियंते, डेटा एन्ट्री ऑपरेटर व अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.



## भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुलासाठी जागा व वाळू उपलब्धतेसाठी महसूल व ग्रामविकास विभागाने समन्वयाने काम करण्याची आवश्यकता - मा. राज्यमंत्री, ग्रामविकास व महसूल

मा. राज्यमंत्री, ग्रामविकास व महसूल, श्री.अब्दुल सत्तार यांच्या अध्यक्षतेखाली व विभागीय आयुक्त पुणे, श्री.सौरभ राव यांच्या प्रमुख उपस्थितीत दिनांक २३ नोव्हेंबर, २०२१ रोजी विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे येथे पुणे जिल्ह्याची विविध आवास योजनांच्या प्रगती बाबत आढावा बैठक संपन्न झाली.

या बैठकीला पुणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, डॉ.राजेश देशमुख, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. आयुष प्रसाद, विभागीय आयुक्त कार्यालयाचे उपायुक्त (विकास), श्री. विजय मुळीक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक, श्रीमती शालिनी कडू व विभागीय आयुक्त कार्यालयाचे महसूल व ग्रामविकास विभागाचे इतर अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीमध्ये मा. राज्यमंत्री, ग्रामविकास व महसूल, श्री. अब्दुल सत्तार यांनी राज्यात राबविण्यात येत असलेल्या विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांचा आढावा घेतला. जागे अभावी बहुतांश लाभार्थ्यांचे घरकुलाचे स्वप्न पूर्ण होत नाही. तसेच घरकुलांचे बांधकाम जलद गतिने पूर्ण करावयाचे असल्यास लाभार्थ्यांना वाळूची उपलब्धता वेळेत व त्यांच्या जवळच्या ठिकाणी (वाळू घाट) करण्याची आवश्यकता आहे. याकरीता महसूल व ग्रामविकास विभागाने समन्वयाने काम करण्याची आवश्यकता असल्याचे मा. राज्यमंत्री, ग्रामविकास व महसूल, श्री. अब्दुल सत्तार यांनी उपस्थितांना सांगितले.



## मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग यांच्या अध्यक्षतेखाली डेमो हाऊसेस मध्ये कॉप-शॉप सुरू करणेबाबत समन्वय बैठक

मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १ डिसेंबर, २०२१ रोजी बांधकाम भवन, मुंबई येथे राज्यात पंचायत समिती आवारात उभारणी करण्यात आलेल्या डेमो हाऊसेसमध्ये लाभार्थी/महिला स्वयंसहायता गटाच्या दर्जेदार उत्पादनांच्या विक्रीसाठी कॉप-शॉप सुरू करणेबाबत समन्वय बैठक संपन्न झाली.

या बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, डॉ. हेमंत वसेकर, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ, श्री. मिलिंद आकरे व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे उपस्थित होते.

या बैठकीमध्ये संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांनी राज्यात पंचायत समिती आवारात उभारण्यात आलेल्या डेमो हाऊसची माहिती व त्याबाबतचे फोटोसह सादरीकरण केले. तसेच डेमो हाऊसेस उभारणीचा उद्देश व भविष्यात याचा ग्रामीण जनतेला उपयोग याविषयी माहिती दिली.

महा आवास अभियान-ग्रामीण २.० अंतर्गत राज्यात डेमो हाऊसेस मध्ये कॉप-शॉप सुरू करण्याच्या सूचना मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार यांनी उपस्थितांना दिल्या.




## राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांच्या समन्वयाने अधिकाऱ्यांच्या राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन

मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २ व ३ डिसेंबर, २०२१ रोजी मुंबई येथे महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांनी अधिकाऱ्यांच्या राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. सदर परिषदेमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांच्या समन्वयाने राज्यात महा आवास अभियान-ग्रामीण २.० ची प्रभावी अंमलबजावणी करीता संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

या परिषदेला मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार यांच्यासह मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, डॉ. हेमंत वसेकर, संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे, सर्व विभागीय आयुक्त कार्यालयाचे उपायुक्त (विकास), जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान व राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

या बैठकीमध्ये संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांनी महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत राबववायाचे उपक्रम व त्यानुषंगाने करावयाची आवश्यक कार्यवाही याविषयी सादरीकरण व मार्गदर्शन केले. तसेच ग्रामीण गृहनिर्माण ॲप बाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. या बैठकीला सी.एस.सी. चे अधिकारी उपस्थित असल्याने जिल्हास्तरावर ग्रामीण गृहनिर्माण अभियंते यांचे मानधन व कार्यादेश देणेबाबत चर्चा करण्यात आली.

मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार यांनी महा आवास अभियान-ग्रामीण यशस्वी करण्याचे सर्वांना आवाहन केले.





## राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांच्या समन्वयाने महा आवास अभियान-ग्रामीण २०२१-२२ अंतर्गत 'ग्रामीण गृहनिर्माण अभियंता ॲप' चा शुभारंभ

महा आवास अभियान ग्रामीण अंतर्गत ग्रामीण गृहनिर्माण योजनाच्या गतिमानता व गुणवत्ता वाढीसाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात येते. असाच एक नाविन्यपूर्ण उपक्रम **'ग्रामीण गृहनिर्माण ॲप'** च्या माध्यमातून राबविण्यात येत आहे. ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रभावी अंमलबजावणी मध्ये ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्यांची महत्वाची भूमिका आहे. त्यांनी केलेल्या कामाचे संनियंत्रण व मूल्यमापन करण्यासाठी **'ग्रामीण गृहनिर्माण ॲप'** ची निर्मिती करण्यात आली आहे. या ॲपचा शुभारंभ दिनांक २६ नोव्हेंबर, २०२१ रोजी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, अहमदनगर येथे करण्यात आला.

याप्रसंगी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, नवी मुंबई, डॉ.राजाराम दिघे, अहमदनगर जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. राजेंद्र क्षीरसागर, सभापती कृषि व पशुसंवर्धन, श्री. सुनील भाऊ गडाख, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. लांगोरे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक, श्री.सुनील कुमार पठारे, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे राज्य समन्वयक, श्री. राम आघाव, अहमदनगर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे श्री. साळवे (सहाय्यक अभियंता), श्रीमती बीचके (सहाय्यक लेखा अधिकारी), श्री. शेख (वरिष्ठ लेखा), श्री. कांडेकर (विस्ताराधिकारी सांख्यिकी), श्री भराट (कनिष्ठ सहाय्यक), श्री. अमृत आदित्य (जिल्हा प्रोग्रामर), तसेच जिल्हा व तालुकास्तरावरील सर्व डेटा एन्ट्री ऑपरेटर व ग्रामीण गृहनिर्माण अभियंते उपस्थितीत होते.

**'ग्रामीण गृहनिर्माण ॲप'** निर्मितीचे उद्देश, ॲप वापरायची कार्यपध्दती, ॲप मुळे अंमलबजावणी यंत्रणा व ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्यांना होणारे फायदे, ॲप मध्ये समाविष्ठ घटक याविषयी संपूर्ण प्रशिक्षण राज्य समन्वयक, श्री. राम आघाव यांनी उपस्थितांना दिले.

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, अहमदनगर यांच्या समन्वयाने **'ग्रामीण गृहनिर्माण ॲप'** चा प्रायोगिक तत्वावर वापर अहमदनगर जिल्ह्यात होत असल्याचे संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, नवी मुंबई, डॉ.राजाराम दिघे यांनी सांगितले.



# केंद्र व राज्य सरकार यांना ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रासंबंधी पॉलिसी इनपुट

## महा आवास अभियान-ग्रामीण २०२१-२२

'सर्वांसाठी घरे-२०२२' हे केंद्र शासनाचे महत्वाचे धोरण असून राज्य शासनाने देखील या धोरणाचा स्विकार केला आहे. त्या अनुषंगाने राज्यात राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाच्या माध्यमातून केंद्र व राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण गृहनिर्माण योजना राबविण्यात येत असून त्यांना पूरक पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, अतिक्रमण नियमानुकूल करण्याची योजना अशा योजनाही राबविण्यात येत आहेत.

गत वर्षी **राष्ट्रीय आवास दिनाचे औचित्य साधून** राज्यात सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजना अधिक गतिमान करण्यासाठी व गुणवत्तावाढीसाठी दिनांक २० नोव्हेंबर, २०२० ते ०५ जून, २०२१ या कालावधीत **'महा आवास अभियान-ग्रामीण'** राबविण्यात आले होते. दिनांक २० नोव्हेंबर २०२० ते ०५ जून २०२१ या कालावधीत राबविण्यात आलेल्या महा आवास अभियान-ग्रामीणमुळे विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या अंमलबजावणीमध्ये आलेली गतीमानता व गुणवत्तावाढ विचारात घेता सन २०२१-२२ या वर्षामध्ये **'महा आवास अभियान-ग्रामीण २०२१-२२'** राबविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

सन २०२१-२२ या वर्षामध्ये महाराष्ट्र राज्यात दिनांक २० नोव्हेंबर, २०२१ रोजीच्या राष्ट्रीय आवास दिनाचे औचित्य साधून केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना **या सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या अंमलबजावणी मध्ये गतिमानता व गुणवत्ता वाढीसाठी दिनांक २० नोव्हेंबर २०२१ ते ३१ मार्च, २०२२ या कालावधीत 'महा आवास अभियान-ग्रामीण २०२१-२२'** राबविण्यास ग्रामविकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.प्रआयो-२०२१/प्र.क्र.९७/योजना-१०, दिनांक १६ नोव्हेंबर, २०२१ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार या अभियानाची संपूर्ण राज्यात अंमलबजावणी करण्यात येत आहे.




## महा आवास अभियान-ग्रामीण २०२१-२२ अंतर्गत जिल्हास्तरीय डेमो हाऊसेसची उभारणी

महा आवास अभियान-ग्रामीण २०२०-२१ अंतर्गत तालुकास्तरावरील डेमो होऊसेस पारंपारिक पध्दतीने बांधण्यात आल्यामुळे त्यातून लाभार्थ्यांना नाविन्यपूर्ण, अपारंपारिक, नवनवीन तंत्रज्ञान इत्यादीबाबत मार्गदर्शन मिळण्यास मर्यादा येत आहेत. याचा विचार करता आय.आय.टी. मुंबई प्रशिक्षणात मिळालेल्या माहितीनुसार प्रत्येक जिल्ह्यात किमान एक डेमो हाऊसचे बांधकाम करावे. जे त्या जिल्ह्याची स्थानिक भौगोलिक परिस्थिती, सामाजिक-सांस्कृतिक परिस्थिती तसेच स्थानिक पातळीवरील उपलब्ध बांधकाम साहित्य इत्यादींशी मिळते जुळते असेल. अशा जिल्हास्तरीय डेमो हाऊसेसची उभारणी करण्याचे संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांच्या विचाराधिन होते.

महा आवास अभियान-ग्रामीण २०२१-२२ अंतर्गत घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी व लाभार्थ्यांना मार्गदर्शक ठरण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत जिल्ह्याच्या Geo-Climatic, Socio- Cultural Conditions व Locally Available Construction Materials चा विचार करुन **जिल्हास्तरीय डेमो हाऊसेसची निर्मिती करणे** बाबत उपक्रम राबविण्यात येत आहे. जिल्हास्तरीय डेमो हाऊसेसची निर्मिती करतांना वरील सर्व नमुद बाबींचा विचार करून जिल्ह्यास्तरावरील आय.आय.टी. मुंबई मार्फत प्रशिक्षित अभियंता आणि ग्रामीण गृहनिर्माण अभियंते यांनी आपल्या जिल्ह्याच्या स्थानिक भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास करून सदर डेमो हाऊसचे डिझाईन व अंदाजपत्रक तयार करावे. त्यानंतर संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाची तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घेवून अभियान कालावधीत प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हा परिषद किंवा जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयाच्या आवारात जिल्हा डेमो हाऊसची उभारणी करावयाची आहे.



# प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण सन २०१६-१७ ते २०२०-२१

## संचित प्रगती अहवाल - ३१ डिसेंबर २०२१

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट (PWL+Awaas+) | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक | राष्ट्रीय रँक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ठाणे | ९३४७ | ६७०८ | ६२४४ | ९३.१ | १ | १६० |
| २ | पालघर | ३३९९७ | २५६३९ | २३६२२ | ९२.१ | २ | १८२ |
| ३ | रत्नागिरी | ८११७ | ५९६५ | ५४२४ | ९०.९ | ४ | १२१ |
| ४ | सिंधुदुर्ग | ४५०५ | ३७०५ | ३२९३ | ८८.९ | ५ | २२४ |
| ५ | रायगड | ९४९२ | ७७३३ | ७०८९ | ९१.७ | ३ | २२९ |
|  | कोकण विभाग | ६५४५८ | ४९७५० | ४५६७२ | ९०.४ | १ |  |
| ६ | नाशिक | ८८६२३ | ६८५८४ | ५८५७८ | ८५.४ | ७ | २१९ |
| ७ | धुळे | ६२०७२ | ४६४५७ | ३८४०८ | ८२.७ | ९ | २४४ |
| ८ | अहमदनगर | ६११०२ | ४१९३१ | ३२८४७ | ७८.३ | १३ | ४५३ |
| ९ | नंदुरबार | ११८८६५ | १०००६६ | ७५४६४ | ७५.४ | १८ | ३७० |
| १० | जळगाव | ७८९४१ | ५६१६८ | ३९६८८ | ७०.७ | २७ | ५०९ |
|  | नाशिक विभाग | ४०९६०३ | ३१३२०६ | २४४९८५ | ७८.२ | २ |  |
| ११ | गोंदिया | ९२७१५ | ८२३३५ | ७०४२१ | ८५.५ | ६ | २४३ |
| १२ | वर्धा | १९९७६ | १३१४७ | १०६९१ | ८१.३ | १० | ३८३ |
| १३ | नागपूर | ४२०६८ | २९९६९ | २३४८२ | ७८.४ | १२ | ४५५ |
| १४ | चंद्रपूर | ४१८०५ | २८९५६ | २१९९० | ७५.९ | १७ | ३५९ |
| १५ | गडचिरोली | २९६१५ | २१८४० | १५९२९ | ७२.९ | २४ | ३७६ |
| १६ | भंडारा | ६२४७४ | ५११९८१ | ३३२१९ | ६३.९ | ३३ | ४३० |
|  | नागपूर विभाग | २८८६५३ | २२८२२८ | १७५७३२ | ७७.० | ३ |  |
| १७ | बुलढाणा | ४०७७३ | २३९६२ | १७९६६ | ७५.० | १९ | ४१२ |
| १८ | अकोला | ५०२३३ | ३८७०४ | २८८७८ | ७४.६ | २० | ४६२ |
| १९ | अमरावती | १०१७५५ | ६९६२३ | ५१९१२ | ७४.६ | २१ | ५०८ |
| २० | यवतमाळ | ६१७१६ | ३६५१६ | २६४४९ | ७२.४ | २५ | ३६२ |
| २१ | वाशिम | १९२८० | ९१३६ | ६२९९ | ६८.९ | ३० | ४८८ |
|  | अमरावती विभाग | २७३७५७ | १७७९४१ | १३१५०४ | ७३.९ | ४ |  |
| २२ | कोल्हापूर | १८२६७ | १२९९८ | १०४०५ | ८०.१ | ११ | २७१ |
| २३ | सातारा | १६०७७ | ११०५९ | ८०९९ | ७३.२ | २२ | ३६९ |
| २४ | सोलापूर | ५१६४८ | ३६५३८ | २५५२३ | ६९.९ | २९ | ४११ |
| २५ | पुणे | २२२९२ | १५३११ | १०६९८ | ६९.९ | २८ | ४७५ |
| २६ | सांगली | २२८३५ | १६०४८ | १०७९९ | ६७.३ | ३१ | ४२९ |
|  | पुणे विभाग | १३१११९ | ९१९५४ | ६५५२४ | ७१.२ | ५ |  |
| २७ | हिंगोली | १६७९९ | ९५७५ | ८०४१ | ८४.० | ८ | ३९० |
| २८ | लातूर | १८६३९ | ९२७५ | ७२२४ | ७७.९ | १४ | ३७७ |
| २९ | परभणी | १४२४७ | ६७६६ | ५२५९ | ७७.७ | १५ | ३१६ |
| ३० | उसमानाबाद | ११७८४ | ५३२९ | ४१०९ | ७७.१ | १६ | २७९ |
| ३१ | औरंगाबाद | ३४५१९ | २२०६६ | १६१०० | ७३.० | २३ | ३२२ |
| ३२ | जालना | २३०५३ | ११७०० | ८४५५ | ७२.३ | २६ | ४४९ |
| ३३ | बीड | ३०९९९ | १८४८९ | १२२६६ | ६६.३ | ३२ | ४२१ |
| ३४ | नांदेड | ६६९९७ | ४५१४२ | २६९५१ | ५९.७ | ३४ | ५०३ |
|  | औरंगाबाद विभाग | २१७०३७ | १२८३४२ | ८८४०५ | ६९.० | ६ |  |
|  | एकूण | १३८५६२७ | ९८९४२१ | ७५१८२२ | ७६.० |  |  |

# रमाई आवास योजना सन २०१६-१७ ते २०१९-२०
## संचित प्रगती अहवाल - ३१ डिसेंबर २०२१

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ठाणे | १०२१ | १०१५ | ८३६ | ८२.४ | ६ |
| २ | पालघर | ३९७ | ३९५ | २९६ | ७४.९ | १७ |
| ३ | रत्नागिरी | ५६८४ | ५६८३ | ५१०७ | ८९.९ | २ |
| ४ | सिंधुदुर्ग | १७७५ | १७७४ | १५९९ | ९०.१ | १ |
| ५ | रायगड | १६८९ | १६८३ | १४४१ | ८५.६ | ३ |
| | कोकण विभाग | १०५६६ | १०५५० | ९२७९ | ८८.० | १ |
| ६ | कोल्हापूर | १०८२३ | १०८२३ | ९१५० | ८४.५ | ४ |
| ७ | सातारा | ९४०८ | ९४०६ | ७७२७ | ८२.१ | ८ |
| ८ | सोलापूर | १४५९७ | १४४९९ | ११९३३ | ८२.३ | ७ |
| ९ | पुणे | ८०५९ | ८०१८ | ५७३२ | ७१.५ | २१ |
| १० | सांगली | ६९८४ | ६९६५ | ५००७ | ७१.९ | २० |
| | पुणे विभाग | ४९८७१ | ४९७११ | ३९५४९ | ०.० | २ |
| ११ | नाशिक | ९२७७ | ९१५३ | ६७५६ | ७३.८ | १८ |
| १२ | धुळे | ५५४९ | ५५३२ | ४२९७ | ७७.७ | १२ |
| १३ | अहमदनगर | २४९०० | २४८९९ | १९३१५ | ७७.६ | १३ |
| १४ | नंदुरबार | २७१९ | २३२४ | १६१८ | ६९.६ | २५ |
| १५ | जळगाव | १२३५१ | १२३५० | ८६६५ | ७०.२ | २३ |
| | नाशिक विभाग | ५४७९६ | ५४२५८ | ४०६५१ | ७४.९ | ३ |
| १६ | बुलढाणा | १०९११ | १०९११ | ८३०६ | ७६.१ | १६ |
| १७ | अकोला | १२४०२ | १२२१४ | ८२३७ | ६७.४ | २६ |
| १८ | अमरावती | १०२९२ | १०२४१ | ७८२५ | ७६.४ | १५ |
| १९ | यवतमाळ | १२३४१ | १२२९१ | ८६७७ | ७०.६ | २२ |
| २० | वाशिम | ७१६६ | ७१६६ | ४४०७ | ६१.५ | २८ |
| | अमरावती विभाग | ५३११२ | ५२८२३ | ३७४५२ | ७०.९ | ४ |
| २१ | गोंदिया | ७७३२ | ७७७१ | ६२८२ | ८०.८ | १० |
| २२ | वर्धा | ५६३२ | ५६३२ | ४५५८ | ८०.९ | ९ |
| २३ | नागपूर | ७०३९ | ७०३९ | ५९०७ | ८३.९ | ५ |
| २४ | चंद्रपूर | १८८७३ | १६५३० | ९०३३ | ५४.६ | ३१ |
| २५ | गडचिरोली | ५८८० | ५७८४ | ४०४१ | ६९.९ | २४ |
| २६ | भंडारा | ११०७५ | १०६५२ | ७८२५ | ७३.५ | १९ |
| | नागपूर विभाग | ५६२३१ | ५३४०८ | ३७६४६ | ७०.५ | ५ |
| २७ | हिंगोली | ६७२८ | ६४८० | ५१३६ | ७९.३ | ११ |
| २८ | लातूर | १९३८५ | १९१६८ | १२५१२ | ६५.३ | २७ |
| २९ | परभणी | १३८४१ | १३८१५ | १०६८६ | ७७.४ | १४ |
| ३० | उसमानाबाद | १४४४७ | १४४४८ | ५९७० | ४१.३ | ३४ |
| ३१ | औरंगाबाद | १५३५६ | १५२२६ | ८९६७ | ५८.९ | २९ |
| ३२ | जालना | ९००७ | ८७१६ | ४२४७ | ४८.७ | ३३ |
| ३३ | बीड | १५७३५ | १४६८८ | ८१९८ | ५५.८ | ३० |
| ३४ | नांदेड | १६३०० | १४५९८ | ७४४० | ५१.० | ३२ |
| | औरंगाबाद विभाग | | १०७१३९ | ६३१५६ | ५८.९ | ६ |
| | एकुण | ३३५३७५ | ३२७८८९ | २२७७३३ | ६९.५ | |

# शबरी आवास योजना सन २०१६-१७ ते २०१९-२०

## संचित प्रगती अहवाल - ३१ डिसेंबर २०२१

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कोल्हापूर | ३० | १३ | १३ | १००.० | १ |
| २ | सातारा | १६७ | १२१ | १०३ | ८५.१ | ११ |
| ३ | सोलापूर | ६८५ | ५८० | ५२८ | ९१.० | ४ |
| ४ | पुणे | २६७२ | २२१२ | १८९३ | ८५.६ | ९ |
| ५ | सांगली | ६० | ४९ | ४१ | ८३.७ | १२ |
| | पुणे विभाग | ३६१४ | २९७५ | २५७८ | ०.० | १ |
| ६ | ठाणे | १८८२ | १६३१ | १५८७ | ९७.३ | ३ |
| ७ | पालघर | ७१२५ | ५३३८ | ४५६३ | ८५.५ | १० |
| ८ | रत्नागिरी | २३८ | २०४ | १६० | ७८.४ | १८ |
| ९ | सिंधुदुर्ग | २३ | २२ | २२ | १००.० | २ |
| १० | रायगड | १७७० | १७६६ | ११६७ | ६६.१ | ३० |
| | कोकण विभाग | ११०३८ | ८९६१ | ७४९९ | ८३.७ | २ |
| ११ | नाशिक | १०९४० | ९७०४ | ७४४४ | ७६.७ | २० |
| १२ | धुळे | ७८६० | ६३५६ | ५५९० | ८७.९ | ६ |
| १३ | अहमदनगर | ३८४६ | ३४५३ | २८४१ | ८२.३ | १३ |
| १४ | नंदुरबार | १०८५२ | ७५५५ | ६००२ | ७९.४ | १७ |
| १५ | जळगाव | ५२८९ | ४६१५ | ३७०३ | ८०.२ | १५ |
| | नाशिक विभाग | ३८७८७ | ३१६८३ | २५५८० | ८०.७ | ३ |
| १६ | हिंगोली | ३४३२ | २९५० | २६३७ | ८९.४ | ५ |
| १७ | लातूर | ६९० | ४४१ | ३४१ | ७७.३ | १९ |
| १८ | परभणी | ७५२ | ७०७ | ३२८ | ४६.४ | ३४ |
| १९ | उसमानाबाद | २९३ | १८२ | १२५ | ६८.७ | २७ |
| २० | औरंगाबाद | २५३९ | २२८६ | १६५० | ७२.२ | २४ |
| २१ | जालना | ५६४ | ४४३ | ३५३ | ७९.७ | १६ |
| २२ | बीड | ६५८ | ४१७ | २४५ | ५८.८ | ३१ |
| २३ | नांदेड | १४९१ | १०४४ | ७७० | ७३.८ | २३ |
| | औरंगाबाद विभाग | १०४१९ | ८४७० | ६४४९ | ७६.१ | ४ |
| २४ | बुलढाणा | ११३६ | ९०७ | ७३९ | ८१.५ | १४ |
| २५ | अकोला | १६८२ | ११०४ | ७४९ | ६७.८ | २८ |
| २६ | अमरावती | ४३५९ | ३६४७ | २७७७ | ७६.१ | २२ |
| २७ | यवतमाळ | ५५७२ | ५०७४ | ३५६१ | ७०.२ | २६ |
| २८ | वाशिम | ८०१ | ४८२ | ३२७ | ६७.८ | २९ |
| | अमरावती विभाग | १३५५० | ११२१४ | ८१५३ | ७२.७ | ५ |
| २९ | गोंदिया | २५९९ | १७७१ | १५१६ | ८५.६ | ८ |
| ३० | वर्धा | २८०२ | २६०२ | १९९५ | ७६.७ | २१ |
| ३१ | नागपूर | २६१८ | २१७३ | १८९७ | ८७.३ | ७ |
| ३२ | चंद्रपूर | ६०१६ | ५०४७ | ३५९४ | ७१.२ | २५ |
| ३३ | गडचिरोली | ५७३५ | ४२५९ | २४३९ | ५७.३ | ३२ |
| ३४ | भंडारा | ४६६१ | ४१९४ | २१६६ | ५१.६ | ३३ |
| | नागपूर विभाग | २४४३१ | २००४६ | १३६०७ | ६७.९ | ६ |
| | एकूण | १०१८३९ | ८३३४९ | ६३८६६ | ७६.६ | |

# पारधी आवास योजना सन २०१६-१७ ते २०१८-१९

## संचित प्रगती अहवाल - ३१ डिसेंबर २०२१

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नाशिक | १४३ | ९० | ५६ | ६२.२ | २४ |
| २ | धुळे | ४३२ | ४३१ | ४०६ | ९४.२ | ६ |
| ३ | अहमदनगर | १९८ | १९८ | १५७ | ७९.३ | १८ |
| ४ | नंदुरबार | १० | ० | ० | ०.० | २९ |
| ५ | जळगाव | ५७० | ३७६ | ३१८ | ८४.६ | १७ |
| | नाशिक विभाग | १३५३ | १०९५ | ९३७ | ८५.६ | १ |
| ६ | कोल्हापूर | ७ | ७ | ७ | १००.० | २ |
| ७ | सातारा | २४ | १८ | १७ | ९४.४ | ५ |
| ८ | सोलापूर | २३१ | २०२ | १९० | ९४.१ | ७ |
| ९ | पुणे | १८८ | १५९ | ११२ | ७०.४ | २१ |
| १० | सांगली | ३८ | २४ | २१ | ८७.५ | १३ |
| | पुणे विभाग | ४८८ | ४१० | ३४७ | ०.० | २ |
| १२ | वर्धा | ५० | ५० | ४३ | ८६.० | १४ |
| १३ | नागपूर | ४८ | ४६ | ३४ | ७३.९ | २० |
| १४ | चंद्रपूर | ३५ | १९ | १७ | ८९.५ | ११ |
| | नागपूर विभाग | १३३ | ११५ | ९४ | ८१.७ | ३ |
| १५ | हिंगोली | ३५ | ३५ | ३५ | १००.० | १ |
| १६ | लातूर | १७ | १३ | १३ | १००.० | ३ |
| १७ | परभणी | ५६ | ५६ | ५१ | ९१.१ | ९ |
| १८ | उसमानाबाद | २४७ | २४७ | १९० | ७६.९ | १९ |
| १९ | औरंगाबाद | ५७ | ५० | ३२ | ६४.० | २२ |
| २० | जालना | ३८ | ३२ | १५ | ४६.९ | २५ |
| २१ | बीड | ९२ | ८५ | ७२ | ८४.७ | १६ |
| २२ | नांदेड | ५० | ४२ | ४२ | १००.० | ४ |
| | औरंगाबाद विभाग | ५९२ | ५६० | ४५० | ८०.४ | ४ |
| २३ | बुलढाणा | ३७१ | ३७१ | ३३६ | ९०.६ | १० |
| २४ | अकोला | ३७४ | ३७३ | ३१७ | ८५.० | १५ |
| २५ | अमरावती | ४५१ | ४४४ | ३८९ | ८७.६ | १२ |
| २६ | यवतमाळ | ५९४ | ५९१ | ३७४ | ६३.३ | २३ |
| २७ | वाशिम | ६४ | ६४ | ६० | ९३.८ | ८ |
| | अमरावती विभाग | १८५४ | १८४३ | १४७६ | ८०.१ | ५ |
| | एकुण | ४४२० | ४०२३ | ३३०४ | ८२.१३ | |

# आदिम आवास योजना सन २०१६-१७ ते २०१९-२०

## संचित प्रगती अहवाल - ३१ डिसेंबर २०२१

| अ.क. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नाशिक | १२ | १२ | १२ | १००.० | १ |
| | नाशिक विभाग | १२ | १२ | १२ | १००.० | १ |
| २ | ठाणे | ११६५ | ८४५ | ८०० | ९४.७ | ४ |
| ३ | पालघर | ६११ | ६११ | ४१६ | ६८.१ | ७ |
| ४ | सिंधुदुर्ग | ५३ | ४९ | ४८ | ९८.० | २ |
| ५ | रायगड | ९१६ | ९१४ | ८७४ | ९५.६ | ३ |
| | कोकण विभाग | २७४५ | २४१९ | २१३८ | ८८.४ | २ |
| ६ | यवतमाळ | १५५४ | १५५४ | १०५४ | ६७.८ | ८ |
| | अमरावती विभाग | १५५४ | १५५४ | १०५४ | ६७.८ | ३ |
| ७ | वर्धा | २६ | २६ | २३ | ८८.५ | ५ |
| ८ | नागपूर | २२२ | ० | ० | ०.० | २५ |
| ९ | चंद्रपूर | ६३८ | ३७७ | २०९ | ५५.४ | ९ |
| १० | गडचिरोली | १६९० | १५४६ | १०८१ | ६९.९ | ६ |
| | नागपूर विभाग | २५७६ | १९४९ | १३१३ | ६७.४ | ४ |
| ११ | नांदेड | ४१९ | १८१ | ७९ | ४३.६ | १० |
| | औरंगाबाद विभाग | ४१९ | १८१ | ७९ | ४३.६ | ५ |
| १२ | पुणे | १९ | ० | ० | ०.० | २९ |
| | पुणे विभाग | १९ | ० | ० | ०.० | ६ |
| | एकुण | ७३२५ | ६११५ | ४५९६ | ७५.२ | |

# यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना

## संचित प्रगती अहवाल - ३१ डिसेंबर २०२१

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | गोंदिया | २० | २० | २० | १००.० | १ |
| | नागपूर विभाग | २० | २० | २० | १००.० | १ |
| २ | सोलापूर | ४ | ४ | २ | ५०.० | ३ |
| | पुणे विभाग | ४ | ४ | २ | ५०.० | २ |
| ३ | लातूर | १० | १० | ७ | ७०.० | २ |
| ४ | उसमानाबाद | ३६७ | ३१६ | १४२ | ४४.९ | ४ |
| | औरंगाबाद विभाग | ३७७ | ३२६ | १४९ | ४५.७ | ३ |
| ५ | अमरावती | ४५ | ४५ | १२ | २६.७ | ५ |
| ६ | यवतमाळ | ८० | ८० | २० | २५.० | ६ |
| | अमरावती विभाग | १२५ | १२५ | ३२ | २५.६ | ४ |
| ७ | अहमदनगर | २० | ० | ० | ०.० | ७ |
| | नाशिक विभाग | २० | ० | ० | ०.० | ५ |
| | एकुण | ५४६ | ४७५ | २०३ | ४२.७ | |

# महा आवास अभियानामुळे पक्क्या घराची स्वप्नपूर्ती

मुंडीपार हे गाव गोरेगाव तालुक्यातील गोंदिया जिल्ह्यापासुन १८ किलोमिटर अंतरावर असुन यागावाची ३५०० हजार इतकी लोकसंख्या आहे. या गावात श्री. बसंत उदेलाल बोपचे सर्वसाधारण घरातील एक साधारण व्यक्ती राहातात. त्यांच्या कुटुंबात एकुण ०५ सदस्य असुन त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असून ते व त्यांचे कुटुंब मातीच्या अतिजिर्ण अवस्थेत असलेल्या घरात वास्तव्य करत होते.

अशातच ग्रामपंचायत मुंडीपार येथे महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत ग्रामस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेमध्ये ग्रामपंचायतीचे सरपंच, श्री. सुमेंद्र तुकाराम धमगाये व ग्रामसेवक, श्री.अरविंद किसन साखरे यांनी विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत मंजूर झालेल्या घरकुल लाभार्थ्यांच्या यादीचे वाचन केले. त्या यादीमध्ये श्री. बसंत उदेलाल बोपचे यांना प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत सन २०२०-२०२१ मध्ये घरकुल मंजूर झाले असल्याचे कळविण्यात आले. या कार्यशाळेमध्ये महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत मंजूर झालेल्या घरकुल लाभार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

त्यानंतर ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांनी श्री.बसंत उदेलाल बोपचे यांच्या घराला भेट देवून महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत घरकुल बांधकाम शौचालयसह हे १०० दिवसाच्या आत पुर्ण करण्याचे उद्दिष्ट असल्याचे श्री. बोपचे यांना सांगितले. ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांनी लाभार्थी व ग्रामस्थांच्या उपस्थित घराचे ले-आऊट देवून घरकुल बांधकामास सुरूवात करण्यात आली. श्री. बोपचे यांना मिळालेल्या पहिला हप्ता रूपये २०,०००/- मिळताच त्यांनी घराचे खोदकाम जोता लेव्हल पर्यत बांधकाम पूर्ण केले. ग्राम रोजगार सेवक यांच्या सहकार्याने श्री. बोपचे यांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत प्रथम हजेरी पटानुसार २८ मनुष्य दिवसाचे देयक प्राप्त झाले. त्यानंतर श्री. बोपचे यांना विना विलंब पुढील हप्त्यांचे देय मिळाल्याने त्यांनी अत्यंत कमी कालावधीत शौचालयासह स्लॅबच्या पक्क्या घराचे बांधकाम पूर्ण केले. याकरीता त्यांना वेळोवेळी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत रोजगार मिळाला.

श्री. बसंत उदेलाल बोपचे यांचे घरकुलाचे बांधकाम शौचालयसह पुर्ण झाल्यानंतर ग्रामपंचायतीचे अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांच्या घरकुला भेट देवून घरकुलाची मोजनी करून गाव नमुना ८ मध्ये नोंद घेण्यात आली. श्री. बोपचे यांना शौचालय बांधकामाकरीता स्वच्छ भारत मिशन-ग्रामीण मधून रूपये १२,०००/- अनुदान प्राप्त झाले. ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांनी त्यांच्या घरकुलास भेट देवून घरकुल बांधकाम शौचलयासह पुर्ण झाल्याने जिओ टँगींग करून ग्रामपंचायत नमुना ०८ व घरकुल बांधकाम व शौचालय बांधकाम पुर्ण झाल्याची छायाचित्र काढुन पंचायत समिती कार्यालयास सादर केली. त्यानंतर त्यांना अंतिम हप्ता रूपये २०,०००/ प्राप्त झाला.

मला महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मधून घरकुल मंजूर झाले. घरकुलाचे बांधकाम पूर्ण करणे कामी ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे ग्राम रोजगार सेवक यांच्या सहकार्यामुळे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत अकुशल देयके प्राप्त झाली. माझ्या घरकुलाचे गावामध्ये उत्कृष्ठ बांधकाम असल्यामुळे पंचायत समिती मार्फत ग्राम पंचायतस्तरावरून प्रशस्ती पत्र देऊन गौरविण्यात आले. केंद्र शासनाच्या महत्वाकांशी योजनेमुळे मी कच्च्या घरातुन पक्क्या घराचे स्वप्न साकारले असून माझ्या या घरात मी कुटुंबासह आनंदाने राहातो आहे. याकरीता मी महा आवास अभियान-ग्रामीण राबविणारे सर्व लोकप्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी व शासनाचे मनापासुन आभार मानतो, असे घरकुल लाभार्थी श्री. बसंत उदेलाल बोपचे यांनी सांगितले.




# रमाई आवास योजना व लाभार्थ्याची महत्वाकांक्षा यामुळे पक्क्या घराची निर्मिती

पातुर्डा बु. ग्रामपंचायत विदर्भात अमरावती विभगातील बुलढाणा जिल्हा व संग्रामपूर तालुक्यात आहे. पातुर्डा बु. गाव जिल्हा मुख्यालयापासून ८७ कि.मी. अंतरावर आहे. या गावाच्या शेजारी शेगाव, नांदुरा, अकोला या विदर्भातील तालुक्यांसह जळगाव जिल्ह्याची सिमा आहे. त्यामुळे या गावातील लोक वऱ्हाडी सोबतच अहीराणी भाषेचाही वापर करतात. या गावातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती असून गावाची आर्थिक परिस्थिती सामान्य आहे. गावाच्या शेजारी विदर्भाची पंढरी म्हणजे श्री. गजानन महाराज यांचे समाधी मंदीर स्थळ शेगाव असल्याने गावात मोठ्या प्रमाणात वारकरी समुदाय व मंदिरे आहेत. गावा पासून १० कि.मी. अंतरावर श्री. क्षेत्र नागझरी रेल्वे स्टेशन आहे. अशा या गावात श्री. सुनिल महादेव दाभाडे राहातात.

श्री. सुनिल महादेव दाभाडे गावातील इतर लोकांचे मोठ मोठे घरे व लोकांची श्रीमंती पाहून त्यांचे लहानपणापासुन स्वप्न होत की शाळा शिकुन मोठा साहेब बनायच आणि स्व:ताच मोठं घर बांधायचं, पण गरिबी आणि घरची हालाखीची आर्थिक परिस्थिती यामुळे त्यांचे स्वप्न कधीही पूर्ण होणार नाही असे त्यांना नेहमी वाटत. शिक्षणाची आवड असूनही गरिबीमुळे गाव सोडुन बाहेर गावी पुढच्या शिक्षणाकरीता जाता आले नाही. घरची परिस्थिती बिकट असल्याने कुटुंबाच्या उदरनिर्वाहसाठी कमी वयात गावातच रोजगार हमी योजनेच्या कामावर मजूरी करुन परीवाराचे संगोपन करावे लागले.

एक दिवस श्री. सुनिल महादेव दाभाडे यांना ग्रामपंचायत कार्यालयात बोलविण्यात आले. श्री. दाभाडे यांना ग्रामपंचायतीमध्ये का बोलवले याबद्दल कोणतीही कल्पना नव्हती. पण तिथे गेल्यावर त्यांना कळले की, त्यांना रमाई आवास योजना सन-२०१९-२० घरकुल मंजूर करण्यात आले आहे. श्री. सुनिल महादेव दाभाडे साध्या टिना मातीच्या घरात त्यांच्या परीवारासह राहात होते. परंतु रमाई आवास योजने अंतर्गत घरकुल मंजूर झाल्याने त्यांनी मिळालेल्या संधीचे सोनं करायचे ठरविले. लहानपणा पासून पाहिलेले स्वप्न पूर्ण करण्याची हीच खरी वेळ असल्याचे त्यांच्या लक्षात आले. श्री. सुनिल महादेव दाभाडे यांनी स्वतः मजूरी करून व रमाई आवास योजनेतून मिळालेल्या अनुदानातून पक्क्या घराची निर्मिती केली.

या घरकुलाने माझे जिवनमान उंचावले व मी माझ्या कुटुंबाला चांगले घर बांधुन देवु शकलो. आयुष्यात कधी विचार केला नव्हता की, मजूरी करता, करता आपण स्वतःचे घर बांधु पण रमाई आवास योजनेमुळे मला आज स्वतःचे घर मिळाले. घरकुल बांधकामासह स्वच्छ भारत मिशन-ग्रामीणच्या माध्यमातुन शौचालयाचे बांधकाम पुर्ण करु शकलो. ही माझ्यासाठी आणि माझ्या परीवारासाठी अभिमानाची बाब आहे. मी शासनाचे आणि पंचायत समिती मधील अधिकारी व कर्मचारी यांचे मनःपुर्वक धन्यवाद करतो, असे श्री. सुनिल महादेव दाभाडे यांनी सांगितले.

ग्रामपंचायत पातुर्डा बु. येथील लाभार्थी श्री.सुनिल महादेव दाभाडे यांचे रमाई आवास योजना सन २०१९-२० अंतर्गत घरकुल मंजूर झाले होते. त्यांनी महा आवास अभियान-ग्रामीण मध्ये उत्कृष्ट घरकुलाचे बांधकाम पूर्ण केले. शाळा शिकुन साहेब बनुन आपण एक चांगल घर बांधायच अस श्री. सुनिल महादेव दाभाडे यांचे स्वप्न होते, पण घरची गरीबी आणि हालाखीची परिस्थिती असल्याने ते त्यांच न पुर्ण होणारे स्वप्न आज रमाई आवास योजनेच्या माध्यमातून पुर्ण करू शकले आहे ही शासनासाठी आणि आमच्यासाठी अत्यंत अभिमानाची गोष्ट असल्याचे संग्रामपुरचे गट विकास अधिकारी यांनी सांगितले. मी शासनाच्या वतीने त्यांचे अभिनंदन करतो व महा आवास अभियान-ग्रामीण या अभियानामुळे अशा या कोरोना काळातही कित्येक गोर गरिब, भूमिहीन लोकांचे घरकुलाचे स्वप्न पूर्ण होत असल्याचेही गट विकास अधिकारी यांनी सांगितले.





# घरकुलामुळे पाऊस, वादळ, वाऱ्याची भिती मिटली

वाडीनियमतुल्लापुर ग्रामपंचायत मराठवाड्यात औरंगाबाद विभागा अंतर्गत नांदेड जिल्ह्यातील मुदखेड तालुक्यामध्ये आहे. या ग्रामपंचायतीची साधारण लोकसंख्या १,४१५ इतकी असून गावामध्ये ३०७ कुटंब राहातात. या गावापासून मुदखेड हे तालुका मुख्यालयाचे ठिकाण जवळपास १० कि.मी. अंतरावर आहे. ग्रामपंचायत वाडीनियमतुल्लापुर येथे श्रीमती लक्ष्मीबाई अच्युत खानसोळे रहिवाशी असुन त्यांना प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत सन २०१९-२० या वर्षात घरकुल मंजूर झाले होते.

श्रीमती लक्ष्मीबाई अच्युत खानसोळे यांचे यापुर्वी वाडीनियमतुल्लापुर गावामध्ये साधे मातीचे व पत्र्याचे झोपडी सारखे घर होते. आजूबाजूला डोंगराळ भाग असल्याने पावसाळ्यात अतिवृष्टीमुळे घराच्या छपरातून अविरत पाण्याची गळती व्हायची. वादळ वारे सुटल्यानंतर घर किंवा घरावरचे छप्पर तर उडून जायची मनात कायम भिती निर्मान व्हायची. अशा या कठीण परिस्थतीमध्ये त्या देवाकडे नेहमी विचारणा करायच्या 'माझे पक्के घर आयुष्यामध्ये कधी पुर्ण होणार किंवा नाही'.

श्रीमती लक्ष्मीबाई अच्युत खानसोळे यांनी थेट ग्रामपंचायत कार्यालय गाठले आणि ग्रामीण आवास योजनांबाबत ग्रामपंचायतींच्या अधिकारी/कर्मचारी यांचेकडे चौकशी केली. यावेळी श्रीमती लक्ष्मीबाई अच्युत खानसोळे यांनी ग्रामसेवकांना गावामध्ये इतर लाभार्थ्यांना शासकीय घरकुल मिळत आहे, त्याप्रमाणे त्यांनाही घरकुल मिळण्यासाठी कागदपत्रे, अटी व शर्तीची चौकशी केली. ग्रामसेवक, श्री. राजेश्वर लक्ष्मण भुरे यांनी श्रीमती लक्ष्मीबाई अच्युत खानसोळे यांना प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण विषयी सविस्तर माहिती दिली. तसेच या योजने अंतर्गत तुम्हाला घरकुलाचा लाभ देता येईल असे सांगितले. श्रीमती लक्ष्मीबाई अच्युत खानसोळे यांनी तात्काळ सर्व कागदपत्रांची पुर्तता करून ग्रामपंचायत कार्यालयात सादर केली. ग्रामपंचायत कार्यालयाने ग्रामसभेच्या ठरावासह त्यांचा प्रस्ताव पंचायत समिती कार्यालयाकडे मंजूरीसाठी सादर केला.

पंचायत समिती स्तरावर डेटा एन्ट्री ऑपरेटर, श्री.रामकृष्ण कुलकर्णी डाटा एन्ट्री ऑपरेटर यांनी श्रीमती लक्ष्मीबाई अच्युत खानसोळ यांची सर्व कागदपत्रे तात्काळ ऑनलाईन करून गटविकास अधिकारी, पंचायत समिती मुदखेड यांच्यामार्फत घरकुल मंजूर करून पहिला हप्ता त्यांच्या बँक खात्यात जमा केला. पहिला हप्ता मिळताच श्रीमती लक्ष्मीबाई अच्युत खानसोळ यांनी घरकुल बांधकामास सुरुवात केली. त्यांच्या बांधकामानुसार सर्व हप्ते वेळत मिळाल्याने त्यांचे घरकुल लवकरच पूर्ण झाले. याकामी त्यांना जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे कनिष्ठ अभियंता, सहाय्यक प्रकल्प अधिकारी, प्रकल्प संचालक व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडुन वेळोवेळी सहकार्य लाभले. श्रीमती लक्ष्मीबाई अच्युत खानसोळ यांना घरकुल बांधकामासाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत रूपये १,२०,०००/-, स्वच्छ भारत मिशन-ग्रामीण अंतर्गत शौचालयासाठी रूपये १२,०००/- व मनरेगा अंतर्गत रूपये १८,०००/- अनुदान मिळालेले आहे.

माझे घरकुल पुर्ण झाल्यामुळे मी आता खुप समाधानी आहे. पावसाळ्यामध्ये वादळ वारा सुटल्यास आता मला भिती वाटत नाही. प्रधानमंत्री उज्वला योजने अंतर्गत मला गॅस पण मिळालेले आहे. त्यामुळे मला स्वयंपाक करण्यासाठी जास्त वेळ लागत नाही. यापुर्वी पावसाळयात लाकडे ओली असल्यामुळे एक एक तास चूल पेटत नव्हती व डोळया मध्ये धुर जात होता आणि डोळे कचकच करत होते. यापासुन माझी आता सुटका झाली. मला पक्के घर मिळाल्यामुळे मी अत्यंत आनंदी व मला ज्यांनी सहकार्य केले त्यांचे सर्वांचे ऋणी असल्याचे श्रीमती लक्ष्मीबाई अच्युत खानसोळ यांनी सांगितले.

श्रीमती लक्ष्मीबाई अच्युत खानसोळ यांनी बांधलेले घरकुल हे अत्यंत सुंदर, दर्जेदार व पक्के स्लॅबचे असल्याने संपूर्ण गावात त्यांच्या घरकुलाची व त्यांनी घरकुलासाठी घेतलेल्या परिश्रमाची चर्चा सुरू आहे. त्यांच्या घरकुलाचे कौतुक गावकरीच नाही तर सर्व शासकीय/निमशासकीय अधिकारी व कर्मचारी करता आहे. श्रीमती लक्ष्मीबाई अच्युत खानसोळ यांनी साकारलेले घरकुल म्हणजे सर्व घरकुल लाभार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे.



# वर्षानुवर्षे आलेल्या गरिबीवर मात करत आदिवासींनी साकारले घरकुल

अडावद ग्रामपंचायत खानदेशातील नाशिक विभागा अंतर्गत चोपडा तालुक्यामध्ये आहे. तालुका मुख्यालयापासून १५ कि.मी. अंतरावर हे गाव वसलेले असून या गावामध्ये हिंदी, मराठी व अहीराणी भाषा बोलली जाते. अडावत गावाची लोकसंख्या २४,३५७ असून गावामध्ये ४,८५५ कुटुंब राहातात. या गावामध्ये उनपदेव परीसरा लगत रामजीपडा येथे आदिवासी समुदायाची वस्ती एका खाजगी शेतात गेल्या १५ ते २० वर्षापासून वास्तव्य करीत असून हे सर्व लोक अडावद ग्रामपंचायतीचे मतदार आहेत. परंतु स्वतःची जागा व घर नसल्याने ते गावात झोपड्या करून खाजगी जागेत राहात होते.

सन २०१६ पासून मंजूर झालेल्या प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत 'ब' प्रतिक्षा यादीत या ५० लाभार्थ्यांचे नाव समाविष्ठ करण्यात आले. परंतु त्यांची स्वतःची जागा नसल्याने तसेच ते राहात असलेल्या परिसरात ग्रामपंचायत किंवा शासकीय जागा उपलब्ध नसल्यामुळे त्यांना घरकुलाचा लाभ देण्यास अडचण निर्माण होत होती. त्यांची जागेच्या अडचणीवर तोडगा काढण्यासाठी जिल्हा व तालुकास्तरीय शासकीय यंत्रणेने सर्व आदिवासी बांधवाच्या वारंवार भेटी व बैठकांच्या माध्यमातून सर्वोत्तोपरी प्रयत्न केले. अखेर त्या सर्व आदिवासी बांधवांनी व्यक्तिशः काही रक्कम जमा करून राहत असलेल्या परिसरात शेत विकत घेण्याचे ठरविले. त्यानुसार सर्व आदिवासी लोक कामाला लागले परंतु त्यात सुद्धा एक अडचण निर्माण झाली की आदिवासी बांधवांचे नावावर शेत खरेदी केल्यास ते कलम ३६.३६ नुसार तर दुसऱ्या कोणास खरेदी करता येणार नाही व बिन शेती करण्यास सुदधा अडचण निर्माण होईल, तसेच सदरची वस्ती गावापासून ६ किलोमीटर अंतरावर आहे. याकरीता घरकुला करीता लागणारी जागा शेत गावातील बिगर आदिवासींच्या नावावर खरेदी करण्याचे ठरले. त्यानुसार माजी सरपंच यांचे पती श्री. सचिन हिम्मत महाजन यांचे नावावर शेत खरेदी करण्यात आले. तरीही अडचणी संपता संपत नव्हत्या खरेदी केलेले शेत बिन शेती करण्याची नवीन अडचण निर्माण झाली. याकामी चोपडा पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, श्री. भरत कोसोदे यांचेशी सर्व लाभार्थ्यांनी बैठक केली. याबैठकीमध्ये श्री.भरत कोसोदे यांनी लाभार्थ्यांना याबाबत मार्गदर्शन करत सदर शेत हे सरपंच ग्रामपंचायत या नावाने खरेदी किंवा बक्षिस पत्र केल्यास बिनशेती करण्याची आवश्यकता नाही. तसेच महा आवास अभियानात सदर लाभार्थीना लवकरात लवकर लाभ देता येईल असे सांगितले. त्यानुसार सदर शेत सरपंच ग्रामपंचायत या नावाने खरेदी करून लाभार्थींना प्रत्येकी ५०० स्क्वे. फुट या प्रमाणे घरकुल बांधकामासाठी देण्याचा प्रस्ताव तयार केला. सदरचा प्रस्ताव मंजूरी करीता मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, जळगाव यांचेकडे स्वतः गट विकास अधिकारी चोपडा हे घेवून गेल्याने जागा उपलब्धतेबाबतच्या प्रस्तावास त्वरीत मंजूरी मिळाली.

या ५० आदिवासी लाभार्थ्यांना घरकुलासाठी जागेची उपलब्धता होताच त्यांना पहिला हप्ता विनाविलंब वितरीत करून तात्काळ घरकुल बांधकामास सुरूवात करण्यात आली. पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, शाखा अभियंता, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता व इतर अधिकारी व कर्मचारी यांनी घरकुल बांधकाम सुरू असतांना वेळोवेळी मार्गदर्शन व वेळेत सर्व हप्त्यांची उपलब्धता केली. त्यासोबतच शासनाच्या विविध योजनांशी कृतीसंगम करून शौचालय, नळ जोडणी, विद्युत जोडणी, गॅस कनेक्शन, मनरेगा मधून रोजगाव व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान मधून उपजिविकेचे साधन, इ. चा लाभ या आदिवासी कुटुंबांना देण्यात आला. त्यांना मिळालेल्या घरकुलांमुळे त्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत झाली असून गावात त्यांना प्रतिष्ठेचे स्थान मिळाले आहे. याकरीता त्यांनी शासनाचे आभार व्यक्त केले आहे.





# शासकीय जागेवर साकारले कातकरी समाजासाठी घरकुले

शेंद्रे ग्रामपंचायत पश्चिम महाराष्ट्रात पुणे विभागा अंतर्गत तालुका व जिल्हा सातारा मध्ये आहे. जिल्हा व तालुका मुख्यालया पासून जवळच ८ कि.मी. अंतरावर शेंद्रे हे गाव आहे. या गावाची लोक संख्या ४,०३६ असून गावात ८८२ कुटुंब राहातात. ग्रामपंचायत शेंद्रे येथील वस्तीतील सन २०१६-१७ मध्ये कातकरी समाजातील ९ घरकुले मंजूर होती. या वस्तीतील कातकरी समाजातील ११ लाभार्थ्यांच्या सन २०१८ मध्ये झोपड्या जळून खाक झाल्याने सर्व लाभार्थ्यांची कागदपत्रे नष्ट झाली होती. अशा कठीण परीस्थितीत गावाचे सरपंच व ग्रामसेवक यांनी मदतीचा हात देत सर्व लाभार्थ्यांची कागदपत्रे परत तयार करून देत त्या सर्व पात्र लाभार्थ्यांना शबरी आवास योजने अंतर्गत प्रस्ताव तयार करून मंजूरीसाठी पुढे सादर केला.

शेंद्रे गावातील एकुण २० लाभार्थीपैकी ९ लाभार्थी यांना प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व ११ लाभार्थी यांना शबरी आवास योजने अंतर्गत घरकुले मंजूर करण्यात आली. घरकुले मंजूर असूनही या लाभार्थ्यांकडे स्वतःची जागा नसल्याने घरकुल बांधकाम करण्यासाठी मोठी अडचणी निर्माण झाली. सरपंच आणि ग्रामसेवकांनी लाभार्थ्यांची जळालेली कागदपत्रे परत मिळवून व घरकुल मंजुर करूनही जागे अभावी घरकुल बांधकामात अडचण निर्माण झाल्याने ग्रामसेवक व तलाठी यांनी गावातील शासकीय जागा या बेघर, गरिब, गरजू व भूमिहीन घरकुल लाभार्थ्यांना घर बांधण्यासाठी जागा मिळणेकामी उपविभागीय अधिकारी सातारा यांना प्रस्ताव सादर केला. प्रस्ताव उपविभागीय अधिकारी यांचेकडे सादर केल्यानंतर ग्रामपंचायतीचे पदाधिकारी, ग्रामसेवक, तलाठी व लाभार्थी यांनी जागा उपलब्धतेच्या प्रस्तावास मंजूरीबाबत सातत्याने पाठपुरावा केला. सदर लाभार्थी यांना घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध करणेकामी उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, गट विकास अधिकारी, व पंचायत समितीचे अधिकारी व कर्मचारी सातारा यांनी विशेष प्रयत्न करून शासन दरबारी आवश्यक असलेल्या सर्व कागदपत्राची आणि आवश्यक सर्व शासकीय बाबींची पूर्तता करत या सर्व लाभार्थ्यांना जागेसह घरकुलाचा लाभ देण्याच्या प्रस्तावाला मंजूरी घेतली.

ग्रामपंचायत शेंद्रे येथील २० घरकुल लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी गावापासून दुर व डोंगराळ भागात जागेची उपलब्धता करून देण्यात आली. मंजूर झालेली जागा गावापासून दुर असल्याने ग्रामपंचायतीच्या माध्यमातून रस्ता व जागा सपाटीकरणाचे काम करण्यात आले. घरकुल बांधकाम करतांना पाण्याची कमतरता पडणार नाही, याकरीता ग्रामपंचायतीने विशेष उपाय योजना केल्या. बघता बघता या २० लाभार्थ्यांच्या घरकुलाचे बांधकाम सुरू झाले. घरकुलाचे बांधकाम प्रगतीत असतांना बांधकामाच्या प्रत्येक टप्प्यावर पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, शाखा अभियंता, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता व इतर अधिकारी/कर्मचारी यांनी अवश्यक आर्थिक, तांत्रिक मार्गदर्शन व सहकार्य केले. जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत कार्यालयाच्या माध्यमातून या सर्व घरकुलांना मुलभूत नागरि सुविधा देवून आदर्श घरांची निर्मिती केली. घरकुलाचे बांधकाम पूर्ण झाल्यावर त्या सर्व २० लाभार्थ्यांना घरकुले हस्तांतरित करण्यात आली.

शेंद्रे गावातील हे सर्व लाभार्थी कातकरी समाजातील असून मासेमारी करून उदरनिर्वाह करत गेली २५ वर्ष आपल्या कुंटुबीया सोबत कच्च्या झोपड्या मध्ये राहात होती. मात्र ग्रामीण गृहनिर्माण योजनेमुळे या सर्व २० लाभार्थ्यांना ऊन, वारा, पाऊस यापासून संरक्षण करणारा व सुखाची झोप येईल असा चार भिंतींचा पक्का निवारा मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद पाहण्यासारखा होता. याकरीता सर्व २० लाभार्थ्यांनी ग्रामपंचायत व तालुकास्तरीय पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी व शासनाचे विशेष आभार मानले आहे.





# स्थानिक बांधकाम साहित्य वापरून कमी खर्चात दर्जेदार घरकुलाची निर्मिती

कोटकामते ग्रामपंचायत कोकण विभागा अंतर्गत सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यामध्ये आहे. तालुका मुख्यालया पासून १२ कि.मी. अंतरावर समुद्र किनारी वसलेले कोटकामते हे गाव आहे. या गावाची सर्वसाधारण लोक संख्या १,८०८ असून ४०५ कुटुंब या गावात राहातात. या गावामध्ये कोकणी, मालवणी, मराठी व हिंदी भाषा बोलल्या जातात. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत सन २०२४ पर्यंत सर्वांसाठी घरे देण्याचे उद्दिष्ट शासनाकडून ठरविण्यात आले आहे. सर्वसामान्य नागरिकांना स्वतःचे पक्के घरकुल मिळावे यासाठी कालबद्ध कार्यक्रम केंद्र व राज्य शासनाकडून राबविण्यात येत आहे. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत देवगड तालुक्यामधून कोटकामते या ग्रामपंचायत क्षेत्रातील लाभार्थी श्री. भिकाजी रघुनाथ कोकम या लाभार्थ्यांचे आर्थिक वर्ष २०२०-२१ या मध्ये घरकुल मंजूर करुन ते महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत पुर्ण करण्यात आले.

श्री. भिकाजी रघुनाथ कोकम यांचे राहते घर हे पूर्णतः मोडकळीस आलेले होते. अशातच त्यांना महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत ग्रामीण आवास योजनांची माहिती मिळाली. त्यांनी थेट पंचायत समिती देवगड कार्यालय गाठून घरकुल मिळणे कामी अर्ज केला. त्यांच्या अर्जावर पंचायत समिती कार्यालयाने श्री. भिकाजी रघुनाथ कोकम यांचा घरकुल मंजूरीचा प्रस्ताव मागवून प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत त्यांना गटविकास अधिकारी, श्री. जयप्रकाश परब यांच्या मार्गदर्शनाखाली कागदपत्रांची पुर्तता करुन सन २०२०-२१ या साली प्राधान्य क्रमाने घरकुल मंजूर करण्यात आले. त्यासोबतच त्यांच्या घरकुल बांधकामाच्या टप्प्यानुसार सर्व हप्त्यांच्या रक्कमा (रू.१५,०००/-, रू.४५,०००/-, रू.४०,०००/- व रू.२०,०००/-) लाभार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये थेट जमा करण्यात आल्या. त्यासोबतच श्री. भिकाजी रघुनाथ कोकम यांना महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत देखील त्यांनी केलेल्या कामाची अकुशल देयके प्राप्त झाली.

श्री. भिकाजी रघुनाथ कोकम यांनी त्यांचे घरकुल बांधकाम करतांना गावातील भौगोलिक परिस्थिती व स्थानिक पातळीवरील उपलब्ध बांधकाम साहित्याचा करून कमी खर्चात उत्कृष्ट दर्जाचे घरकुल बांधकाम केले. त्याच्या या घरकुल बांधकामात ग्रामपंचायतीचे ग्रामसेक, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, शाखा अभियंता, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, ग्रामपंचायत व पंचायत समिती स्तरावरील अधिकारी/कर्मचारी यांनी सहकार्य व मार्गदर्शन केले. त्यामुळे पारंपारिक पध्दतीचा व स्थानिक बांधकाम साहित्याचा वापर करून सुंदर घरकुलाची निर्मिती श्री.भिकाजी रघुनाथ कोकम यांनी केली.

माझ्या घरची परिस्थिती गरिबीची असून मला घरकुलाची अत्यंत आवश्यकता होती. मी दररोज कुटुंबाच्या रोजी रोटीसाठी गावापासून १५ ते २० कि.मी. पायपीट करत होतो. पावसाळ्यात माझे जुने घर अक्षरशः पाण्याने भरून जात होते. मात्र आता प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मुळे माझे पक्के घर झाल्याने मला स्थिरता आली आहे. माझे मुलगा व मुलगी शाळेत शिक्षण घेत असल्याने त्यांना पक्या घरामुळे कायमचा निवारा मिळाल्याचा आनंद तर झालाच पण अभ्यासातही त्यांची गोडी वाढली आहे. एकुणच पक्या घरकुलामुळे माझाही आत्मविश्वास वाढला असून पुर्वीपेक्षा अधिक जोमाने काम धंदा करण्याचे नवचैतण्य निर्माण झाले आहे. आता मला घरापासून २ ते ३ कि.मी. पसिसरातच मोलमजूरी मिळत असल्यामुळे पैशाची बचत होवून मी माझ्या कुटुंबाचे पालन पोषण करणेस सक्षम झालो आहे. प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण अंतर्गत शासनाने माझ्या सारख्या गरिबाचे घरकुलाचे स्वप्न पुर्ण केल्याबददल मी शासनाचा व सर्व अधिकारी/कर्मचारी वर्गाचा आभारी असल्याचे घरकुल लाभार्थी श्री. भिकाजी रघुनाथ कोकम यांनी सांगितले.






विभागीय आयुक्त
कोंकण विभाग


महा आवास अभियान २.० (२०२१-२०२२)


ग्राम विकास विभाग
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत


जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी, ठाणे.


महा आवास अभियान-ग्रामीण
तालुकास्तरीय कार्यशाळा
पंचायत समिती, शिरपूर, ता. शिरपूर, जि.धुळे


तालुकास्तरीय पुरस्कार वितरण कार्यक्रम





# मिडीया कवरेज

## सरकारकडून दुसऱ्या टप्प्याचा शुभारंभ
# 'महाआवास'मधून पाच लाख घरे

आवासाटची मदत

## राज्यात पाच लाख घरे बांधण्याचा संकल्प
ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांची माहिती

## ५ लाख घरे पूर्ण करण्याचा संकल्प - ग्रामविकासमंत्री हसन मुश्रीफ

## पाच लाख घरे पूर्ण करण्याचा संकल्प
ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिली माहिती

## आवास योजनांचे उद्दिष्ट ३१ मार्चपर्यंत पूर्ण करा

## ग्रामविकासाचे महाआवास अभियान

## महाआवास अभियानांतर्गत जिल्ह्यात ७ हजार ३६२ घरकुले बांधणार
पालकमंत्री एकनाथ शिंदे यांचे प्रतिपादन: महाआवास कार्यशाळेचे उद्घाटन

## यादीतून वगळलेल्या लाभार्थ्यांचा घरकुलासाठी विचार करा - पालकमंत्री ठाकूर

## महाआवास योजनेतून जिल्ह्यात ९ हजार ८०० घरे बांधणार
जिल्ह्यात एकही नवी झोपडी होता कामा नये - नगरविकास मंत्री

## महाआवास अभियान पर कार्यशाला

## ग्रामीण गृहनिर्माणचा 'आशियाना पॅटर्न' राज्यभर
३४ जिल्ह्यांत योजना राबविण्यासाठी राज्य सरकार विचाराधीन

## ग्रामीण गृहनिर्माणचा 'आशियाना पॅटर्न' राज्यभर

## Expedite construction of 90,000 housing units under Pradhan Mantri Awas Yojana: Divnl Commr

Divisional Commissioner Prajakta Lavangare-Verma during review meeting of Housing for All Schemes at Divisional Commissionerate as other officers look on.

## महाआवास अभियानात अपूर्ण घरकूलांचे काम पूर्ण करा : डॉ. अनिल रामोड

## दुसऱ्या टप्प्यात पालघर जिल्ह्याची प्रगती राज्यव्यापी ठरेल! - पालकमंत्री दादाजी भुसे

## कल्याण पंचायत समितीच्या सभागृहात महा आवास अभियान टप्पा क्रमांक दोनची कार्यशाळा उत्साहात संपन्न

## घरकुलांना जागा शोधण्यासाठी 'टास्क फोर्स'
पुणे विभागातील पाचही जिल्ह्यांसाठी करणार काम; गरजूंना घरकुलासाठी जागा मिळवून देण्याचे लक्ष्य

## घरकूल पूर्ण करण्यासाठी वाळू बँक
जानेवारीची डेडलाईन: घरकूल मंजुरीची प्रक्रिया पंचायतस्तरावर होणार

## घरकुल लाभार्थ्यांची नोंदणीकृत गृहनिर्माण संस्था स्थापन होणार: सिईओ दिलीप स्वामी

## अपूर्ण घरकुले पूर्ण करा : डॉ. दांगडे यांनी दिले यंत्रणांना निर्देश

## जिल्ह्यात १३ हजार ६३९ घरकुलांची कामे अपूर्ण
अतिरिक्त सीईओ धोत्रे यांचे कर्मचाऱ्यांना आवाहन

डिसेंबर अखेर संपूर्ण घरकुलांची कामे पूर्ण करा

## आवास योजनेच्या प्रपत्र 'ड'साठी ग्रामसभा

## शेटफळगढे येथे रमाई योजनेतून साकारले घरकुल

## लाखनी येथे उमेदतर्फे कॉप शॉप
महिला बचत गटांच्या वस्तूंच्या प्रदर्शनाचे आयोजन

## 'महाआवास'मध्ये भोर अव्वल
तालुक्याला मिळाली आठ पारितोषिके; घरकुलांमुळे नागरिक समाधानी

# घरकुलावर गुढी उभारून अनोखा गृहप्रवेश



मा. मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण तथा नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री, श्री. छगन भुजबळ यांच्या अध्यक्षतेखाली महा आवास अभियान-ग्रामीण जिल्हास्तरीय कार्यशाळा संपन्न



मा. मंत्री, सहकार तथा सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री, श्री.बाळासाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली महा आवास अभियान-ग्रामीण जिल्हास्तरीय कार्यशाळा संपन्न




मा. मंत्री, मृद व जलसंधारण तथा उस्मानाबाद जिल्ह्याचे पालकमंत्री, श्री. शकरराव गडाख यांच्या अध्यक्षतेखाली महा आवास अभियान-ग्रामीण जिल्हास्तरीय कार्यशाळा संपन्न




मा. मंत्री, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास, क्रीडा व युवक कल्याण तथा वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री, श्री.सुनिल केदार यांच्या अध्यक्षतेखाली व देवळी तालुक्याचे मा. अमदार, श्री. रणजित कांबळे यांच्या प्रमुख उपस्थितीत महा आवास अभियान-ग्रामीण जिल्हास्तरीय कार्यशाळा संपन्न

# गाणे घरकुलाचे

गड्या, आता घरकुल बांधायचं !
गावानं सुखानं नांदायचं...!!
सत्य माहिती देऊनी, सहकार्य करूया सारे !
गरिबांना घरकुल मिळावे, प्रतिज्ञा सर्वाण करा रे !!
आहे घरकुल यांना, स्वेच्छेने कबूल करावे !
गरजूंच्या डोक्यावरती, मायेचे छप्पर धरावे !!
काळजी तुमची वाहण्या, शासन आले दारी !
तळमळ जाणुनी शासनाची, फक्त माहिती द्यावी खरी !!

गरजूंना छप्पर हक्काचे, हाच ध्यास अखंड राहे !
गोडी असावी गावामध्ये,सरकार रात्रंदिन राबत आहे !!
प्रत्येक गावकरी आपला बंधू, आणि शासन मित्र आहे !
पात्र व्यक्तीला घरकुल मिळावे, हेच अंतिम सूत्र आहे !!
राबणारे हात गावकऱ्यांचे, गाव हीच लोकशाहीची शाळा !
नियम पाळूनी साथ द्यावी, घरकुलात नांदेल प्रेम- जिव्हाळा !!

- कवी :- श्री. यशेंद्र क्षीरसागर, कोरेगाव पंचायत समिती




"महाराष्ट्र शासनाचा एकच ध्यास,
२०२२ पर्यंत सर्वांसाठी आवास"


## संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय

४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४
दुरध्वनी क्र. - ०२२ - २७५६१८२४, महा आवास हेल्पलाईन क्रमांक - १८०० २२ ०१९
ई-मेल - directoriayruralhousing@gmail.com, वेबसाईट - www.mahaawaas.com